

# तारस बुल्बा

निकोलाय गोगल हा युक्रेनियन लेखक अवघ्या त्रेचाळीसाव्या वर्षी मरण पावला. १६-१७व्या शतकात युक्रेनियन जनतेने पोलिश आक्रमकांविरुद्ध लढा दिला. रशियन भूमीपासून युक्रेनची फारकत करण्यात आली होती. भौतिक-सांस्कृतिक-आध्यात्मिक अशा साऱ्या बाबतीत युक्रेनियन जनतेचा अध:पात करण्याचे तंत्र कसोशीने अंमलात येऊ लागले. त्या पोलिश आक्रमणाला युक्रेनच्या कोसॅक जमातीकडून कडवा प्रतिकार करण्यात येऊ लागला. झापुर्झियन कोसॅकांनी युक्रेनच्या मुक्तीसाठी आणि आपल्या रशियन मायभूमीतील बांधवांशी एकरूप होण्यासाठी चालू केलेला प्रचंड लढा हा या कादंबरीचा मध्यबिंदू आहे.

रशियावर आक्रमण करणाऱ्या पोलिश आणि तार्तर लोकांना खडे चारणारे कोसॅक वीर भारताला आजच्या काळात स्फूर्ती देतील.

आपला देशही तेव्हा परकीय आक्रमणाच्या छायेत होता. देशातील तरुणांचे बाहु स्फुरण पावतील, अंगरख्याचे बंद तटातटा तुटतील व शत्रूवर चालून जाण्याचे स्फुरण त्यांना येईल, अशा कथा आज हव्या आहेत. अशी दत्त आपटे यांची धारणा तारस बुल्बाची कथा अशीच आहे. भारतीय वीराग्रणींच्या मालिकेत शोभणारा असाच तो वीर आहे.

*स्वातंत्र्यप्रेमी, बेदरकार, साहसी आणि शूर अशा स्वयंभू सेनानीची ही जितकी रोमहर्षक तितकीच करुणरम्य कथा , निकोलायू गोगल या युक्रेनियन लेखकाच्या लेखणीतून उतरली त्या कथेचा हा संक्षिप्त अनुवाद मुंबईच्या 'ढवळे समूहा'तील कर्नाटक प्रकाशन संस्थेने १९६५मध्ये चेतक पुस्तक मालिकेत प्रकाशित केला.*


| | प्रकरण | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | पिता-पुत्र | २५३ |
| २ | प्रवास | २५६ |
| ३ | सेचमध्ये | २६० |
| ४ | रणांगणाकडे | २६३ |
| ५ | डब्नोचा वेढा | २६७ |
| ६ | अँड्री जमातीला मुकला | २७० |
| ७ | अँड्रीचा तपास लागला | २७४ |
| ८ | देशद्रोह्याचा शेवट | २७७ |
| ९ | वारसात | २८१ |
| १० | शेवट | २८४ |




# तारस बुल्बा

## १. पिता-पुत्र

''यंऽव! काय पण अवतार? काय लेको पोरं आहात की बुजगावणी? पाद्र्याप्रमाणे हे पायघोळ डगले कसले अडकवले आहात? लेकाच्यांनो, तुमच्या विद्यालयात सारेचजण असा पोशाख करतात काय?''

कीव्हमधील विद्यालयात आपला अभ्यासक्रम पुरा करून घरी परत आलेल्या दोन मुलांचे स्वागत म्हाताऱ्या बुल्बाने वरील शब्दांत केले.

मुले नुकतीच घोड्यावरून खाली उतरली होती. बुल्बाचे दोघेही मुलगे अंगापिंडाने अगदी मजबूत दिसत होते, पण दोघांच्याही मुद्रेवर विद्यालयीन अवस्थेतील बावळटपणा पुरेपूर दिसत होता. त्यांच्या आरोग्य-संपन्न गुबगुबीत चेहऱ्यावर सर्वत्र कोवळी कुरळी लव उगवलेली असून तिला अद्यापि वस्तऱ्याचा स्पर्श झालेला नसल्याने हा बावळेपणा अधिकच उठून दिसत होता. पित्याने केलेले हे अजब स्वागत पाहून ते चांगलेच बावचळल्यागत झाले; आणि माना खाली घालून स्तब्ध उभे राहिले.

''थांबा बेट्यांनो, तुम्हाला एकदा नीट पाहून घेतो!'' म्हातारा निरीक्षण करू लागला. ''छाऽ भलतेच लांब कोट, असले हे अवतार मी तर कधी जन्मात पाहिले नव्हते! जरा पळून दाखवा रे पोरांनो, मला वाटतं ह्या डगल्यांत घुटमळून तुम्ही लगेच पालथे व्हाल!''

''बाबा! बाबा! आमची अशी कुचेष्टा करण्याचं, हसण्याचं कारण नाही!'' थोरला मुलगा अखेर म्हणाला.

''बघा लेकाच्यांची घमेंड! का रे बाबांनो, तुमचं ध्यान पाहून हसू नये तर काय करावं?''

''तुम्ही बाबा असाल, पण आमच्याकडे पाहून कुचेष्टेने हसणाऱ्यांच्या बरगड्या सैल करण्याचा आमचा प्रघात आहे. मग तो बाप असो अगर आणखी कोणी असो!''

''कृतघ्न कार्टी! बापाच्या बरगड्या सैल करणार म्हणे!'' बुल्बा आश्चर्याने चार पावले मागे सरून म्हणाला.

''असाल! असाल बाबा! म्हणून काय मी तुमच्याकडून अपमान करून घ्यावा? मी ही गोष्ट कुणालाच करू देणार नाही!''

''मग काय माझ्याशी लढणार तू? कसं? ठोसाठोशी करणार?''

''हो! कसंही!''

''ठीक आहे. मग बघूदेच मला तुझ्या ठोशाची ताकद!'' असे म्हणत बुल्बाने आपल्या अस्तन्या मागे सारल्या.

पुष्कळ दिवसांनी घरी परत आलेल्या मुलांचे आगत-स्वागत करण्याचे तर दूरच राहिले, पण

बुल्बाने थोरल्या मुलाशी मुष्टीयुद्धच चालू केले. ते बरगड्यात, पोटात ठोसे मारू लागले. ते घटकेत मागे सरत, पवित्रे घेत व फिरून त्वेषाने चाल करून एकमेकांस भिडत, मुष्टिप्रहार करीत.

''या बाबांनो, सारेजण या आणि ह्या पोरांच्या बापाला लागलेलं खूळ पहा.'' बुल्बाची बायको, त्या मुलांची आई, शेजाऱ्या-पाजाऱ्यांना उद्देशून ओरडून म्हणाली. म्हातारी अगदीच हडकुळी व पांढरी फटक दिसत होती. मुलांना भेटणेही तिला या प्रकाराने अशक्य झाले.

''मुले आताच दारात येत आहेत. वर्षभरात बिचारी दृष्टीसही पडली नव्हती! पोरांचा पाय घरात पडण्यापूर्वीच ही मेली मारामारी!'' ती काकुळतीने म्हणाली.

''पोरगं चांगलंच लढतंय?'' बुल्बा हात आवरता घेत म्हणाला व आपले कपडे झटकू लागला. ''आपलं पोरगं भलतंच नामी लढतंय! त्याचं नाव मी काढायला नको होतं. खरं कोसॅक गडी बनणार पोरगं! चला रे पोरांनो, घरात चला!'' तो ओरडला. '' आणि हे पहा, तुमच्या ह्या बापाला भेटा. त्याचं चुंबन घ्या!'' बुल्बा भरघोस हसून म्हणाला. मग त्याची मुले धावून पुढे आली आणि बापाला कडकडून भेटली.

''ठीक ठीक. पोरांनो, तुमच्या वाटेला जाणाऱ्या प्रत्येकाची हाडं अशीच सैल करीत जा, बरं का! लेकाच्यांनो, माझं पेकाट चांगलंच ढिलं केलंत की! आणि काय रे धाकट्या पोरा, अजागळागत हात लोंबत सोडून का उभा राहिला आहेस? चल ये इकडं. तू करणार का जरा ठोसाठोशी?''

'' सदा टाळक्यात मेला हाच विचार!'' धाकट्याला कुरवाळीत बुल्बाची बायको म्हणाली. ''पोरांच्या बरोबर मारामारी करणारे मुलखावेगळे वडील आहात तुम्ही. पोरं दमूनभागून घरी आली तरी त्यांच्या खाण्यापिण्याची काही चौकशी कराल, की मारामारी करीत सुटाल?''

''एऽ पोरांनो, या म्हातारीचे काही ऐकू नका हं, बोलूनचालून ती बाईमाणूस. सदासर्वकाळ तुम्ही कुकुली बाळंच राहावं, अशी तिची कल्पना आहे. खुली मैदानं, घोडदौड, रणांगणातील कचाकची, हे जीवन तुम्हाला जगायचं आहे. ही तलवार पाहिलीत का? हीच तुमची खरी आई! शाळामास्तरांनी नाना विषयांची पुस्तकं तुमच्या डोक्यात कोंबली असतील. थू: त्येच्या! तुम्हाला आता झापुर्झीलाच पाठवतो. हवं असलेलं खरं शिक्षण तुम्हाला तिथेच मिळणार आहे.''

''मुलं इथे आठवडाभर तरी राहणार आहेत की नाही?'' बुल्बाची म्हातारी बायको मोठ्या कष्टाने म्हणाली,'' गरीब बिचारी, मुलं घरी आली, म्हणून त्याचं काही कोडकौतुक होईल तर शपथ. त्यांना काही गोडधोड करून घालीन म्हटलं, तर फुरसत नाही!''

''गप्प बैस म्हातारे! तुझं बडबडणं बंद कर पाहू आधी. बायकांच्या संगतीत रमायला कोसॅक पोरांना वेळ असत नाही! कोंबडीने अंड्यावर बसावं त्याप्रमाणे पोरांना कुशीत घेऊन बसण्याचा तुझा विचार आहे. जा, नीघ इथून. आणि हे पाहा, जेवणाची तयारी कर. तुझं ते गोडधोड चुलीत घाल आणि एक अख्खा बोकड शिजव! पिण्यासाठी उत्तम व्होडका काढ. व्होडका चमकली पाहिजे, फसफसली पाहिजे!'' असे म्हणत बुल्बाने मुलांना एका खोलीत नेले.

खोली कोसॅक पद्धतीने शृंगारलेली होती. भिंतीवर ठिकठिकाणी तलवारी, कट्यारी, कमावलेल्या कातड्याचे काळेभोर आसूड लटकलेले दिसत होते. बंदुकी व त्यांना लागणारी दारू भरलेली अनेक शिंगरेही तेथे दिसत होती. या साऱ्या वस्तू बुल्बाने मारलेल्या अनेक लढायांतून संपादन केलेल्या होत्या. मध्यावर एक प्रशस्त टेबल ठेवले होते, तर सभोवार चेरी लाकडाची मजबूत बाके टाकलेली दिसत होती. ''पोरं मोठी उमदी आहेत, आपण लवकर त्यांना सेचमध्ये पाठवणार!'' बुल्बा सारखा घोकत होता.

थोड्याच वेळात मेजवानीचा आस्वाद घेण्यासाठी शेजारीपाजारी गोळा झाले. बुल्बाची उमदी पोरं पाहून सर्वांनीच त्याचे अभिनंदन केले, पोरांचे कौतुक केले, सर्वांनीच मुलांना झापुर्झीच्या सेचमध्ये रवाना करण्याची शिफारस केली.

''बसा बसा मंडळी, आपण प्रथम व्होडकाचा आस्वाद घेऊ! ओस्टाप, अँड्री, तुम्हा दोघांना उदंड आयुरारोग्य लाभो!'' बुल्बाने प्याला हाती घेत शुभेच्छा व्यक्त केली. ''पोलिश, तार्तरी अगर तुर्की कुणीही असोत, तुमच्या दणक्याला हमखास बळी पडलेच पाहिजेत! पोलिश लोक

धर्मलंड आहेत, अश्रद्ध आहेत. त्यांची हाडे तुम्ही नरम केलीच पाहिजेत! घ्या, घ्या तुमचे प्याले आणि भरा व्होडका! व्होडकाला लॅटिन भाषेत काय म्हणतात माहीत आहे? लॅटिन लोक गाढवच होते. त्या लेकांना व्होडका माहीतच नसेल! त्यांच्यात एक कविता करणारा होता म्हणे; काय बरं त्याचं नाव? होरेस का?''

''तसंच काहीतरी असेल.'' बापाच्या बडबडीला कंटाळलेला ओस्टाप म्हणाला.

''असेल म्हणे! काय लेकाच्यांनो, एवढंही माहीत नाही? विद्यालयात तुमची पेकाटं कोरड्याखाली भरडली नाहीत वाटतं कुणी?''

''तिथं काय झालं असेल ते असो, पण आता कुणी आमच्या अंगास हात लावण्यास धजावणार नाही! आता कुणी तसा प्रयत्न केल्यास कोसॅक तलवारीचा हिसका त्याला अनुभवावा लागेल!'' धाकटा मुलगा अँड्री म्हणाला.

''यंऽव रे पोरा! अशी तडफ पाहिजे. बस्स, बस्स. मी स्वत:च तुम्हाला सेचकडे घेऊन जाणार! या डुकरा-कोंबड्यांच्या कळपात बसून बसून कंटाळा आला आता. मीही कोसॅकच आहे! ही बायको, ही शेती, जाऊ दे सारं खड्ड्यांत! मीही तुमच्याबरोबरच झापुर्झीला येणार!'' बुल्बाच्या अंगातील कोसॅक रक्त सळसळू लागले, त्याचे मृत झालेले यौवन फिरून तरारल्यागत झाले. तो उठून मोठ्या ताठ्यात उभा राहिला व दाणकन् जमिनीवर पाय आपटून गरजला, '' बस्स्, आपण उद्याच जाणार; इथे कोणता शत्रू बोंबलायला येणार आहे? हे झोपडं नि हा पसारा सांभाळीत बसून काय करायचंय? नुसती अडगळ!'' असे बडबडून त्याने तावातावाने काचेचे प्याले, बशा, भांडी, जमिनीवर कचाकच आपटून फोडून टाकली.

त्याची म्हातारी बायको त्याच्या या आततायीपणाकडे उदासपणे पाहात उभी होती. त्याचा आततायीपणा तिच्या परिचयाचा होता. तो सहन करणे तिच्या अंगवळणी पडले होते. तिच्या अंत:करणात खरी भीती होती म्हणजे आपली मुले पुन्हा लवकरच आपणास सोडून जाणार हीच होय. ती अश्रू ढाळीत होती व हुंदका बाहेर येऊ नये म्हणून गुदमरल्या अंत:करणाने धडपडत होती. ओठ घट्ट मिटून धरीत होती.

बुल्बाचा कठोरपणा तसा भयानकच होता. युरोपमधील भटक्या जमातीत पंधराव्या शतकात आढळून येणारी कठोरता व बेदरकारपणा त्याच्या अंत:करणात पुरेपूर भिनला होता. दक्षिण रशियात मंगोलियन लोकांनी त्या काळात जो धुमाकूळ घातला, त्याचा कडवा प्रतिकार करण्यासाठी रशियन लोकांची जी एक विशिष्ट मनोवृत्ती तयार झाली, त्यामध्येच बुल्बाचे व्यक्तिमत्व घडविले गेले. ह्या कोसॅक लोकांच्या स्वयंशासित वसाहती सर्वत्र तयार झाल्या होत्या. त्यांच्यात लष्करी बाणा पुरेपूर भिनला गेला. वसाहती दक्षिण रशियात सर्वत्र विखुरल्या गेल्या असल्या, तरी त्या इतक्या संघटित होत्या, की इशारा मिळण्याचा अवकाश, सारी कोसॅक जमात एकत्रित येई. पुढे पोलिश साम्राज्याचा उदय झाल्यानंतर पोलंडच्या राजाने या लोकांना चुचकारून अंकित करण्याचा प्रयत्न केला. अनेक कोसॅक योद्ध्यांना पोलिश सरदारांच्या बरोबरीने सरदारकी देऊ केली, पण बुल्बा ह्या आमिषाला बळी पडला नाही. पोलंडच्या राजाला आपली निष्ठा देणाऱ्या कोसॅक सरदारांना तो तुच्छ लेखी. एक्कलकोंडेपणाने आयुष्य कंठी.

तो अभिजात योद्धा होता. पोलंडच्या संस्कृतीचा रशियात होऊ लागलेला प्रसार, प्रचार, त्याला असह्य वाटत होता. पोलिश अधिकाऱ्यांनी करवसुलीसाठी रयतेला त्रास दिला, आपल्या रूढी परंपरा लोकांवर लादण्याचा प्रयत्न केला, अगर मुस्लिम धर्मीयांनी आक्रमण केले तर आपल्या कोसॅक तलवारीचे पाणी या सर्वांना दाखविण्यासाठी तो सदैव सिद्ध असे. विशेषत: ख्रिश्चन धर्मावर घाला घालण्यास टपलेल्या तुर्कांना, मुस्लिमांना धूळ चारण्यासाठी त्याचे हात शिवशिवत असत.

सेचला पोचल्यानंतर तेथे कोण कोण भेटतील? जुन्या ओळखीच्या लोकांना आपण आपल्या मुलांचा परिचय कसा करून देऊ? ह्या विचारात बुल्बा आता गढला होता. खरे म्हणजे प्रथम नुसत्या मुलांनाच पाठविण्याचा त्याचा विचार होता. पण आता मात्र स्वत:च मुलांना घेऊन जाण्याचा निर्णय त्याने केला होता. ''ठीक आहे. मुलांनो, उठा आता आणि एक झक्क झोप काढा! उद्या आपल्याला निघायचं आहे!''

रात्रीचे साम्राज्य सुरू झाले होते. बुल्बा सामान्यत:

लवकरच झोपे. त्याने बाहेर अंगणातच एक बुरणूस टाकला व अंगात मेंढीच्या कातडीचा भला मोठा डगला अडकवून तो त्यावर अंगणातच लवंडला. हां हां म्हणता घोरूही लागला. अल्पावधीतच अंगणात त्याच्या आजूबाजूला पसरलेल्या इतर सर्वांचेही घोरणे चालू झाले.

बुल्बाची बायकोच काय ती एकटी जागी होती. मुलांच्या उशागती बसून राहिली होती. अश्रू ढाळीत होती. मुलांच्या केसांवरून ममतेने हात फिरवीत होती. ''पोरांच्या दैवात काय आहे कोण जाणे!'' ती स्वत:शीच पुटपुटली. सकाळ होताच मुलांचा बाप त्यांना घेऊन जाणार ह्याबद्दल तिला काडीमात्र शंका नव्हती. 'कोसॅक जीवनाचा धकाधकीचा मामला चालू झाल्यानंतर कुणी सांगावं? मुलं कदाचित् तार्तर लोकांच्या तावडीत सापडतील. क्रूर तार्तर त्यांची मुंडकी कापून नेतील.' एक ना दोन! अनेक भयानक विचार तिच्या मातृहृदयाचा थरकाप उडवीत होते. तिच्या तोंडातून एक अस्फुट हुंदका बाहेर पडला.

आकाशात चंद्र खूपच उंच चढला होता. त्याचा शुभ्र प्रकाश सर्वत्र पसरला होता. अंगणात इतस्तत: पडलेले कोसॅक एका सुराने घोरत होते. रात्रीची प्रगाढ शांतता त्यामुळे थोडी भंग पावत होती. अंगणाच्या कडेने झाडेझुडपे माजली होती. म्हातारी अद्यापि डोळ्याला डोळा न लावता निश्चल बसून होती. असा किती वेळ गेला कोण जाणे? कोठून तरी घोड्यांचे खिंकाळणे ऐकू आले. दूर क्षितिजावर आकाशात तांबडे, नारंगी पट्टे दिसू लागले, प्रात:काळची चिन्हे सर्वत्र दिसू लागली.

बुल्बा एकदम जागा झाला व ताडकन् उठून उभा राहिला. आज आपण प्रवासास निघणार आहोत या जाणिवेने तरारून गेला. ''उठा, उठा पोरांनो! आपापले घोडे निवडून घ्या! म्हातारीला म्हणावं लांब जायचं आहे. खाण्यापिण्याची नीट तयारी कर.'' त्याच्या ह्या आरड्या-ओरड्याने म्हातारीची उरलीसुरली आशा नष्ट झाली. ती मुकाट्याने उठून आत गेली व उद्योगाला लागली.

बुल्बा आरडाओरडा करून नोकर-चाकरांना प्रवासाच्या तयारीचे हुकूम सोडू लागला. मुलांनी घालावयाचे कपडे, त्यांनी बाळगावयाची हत्यारे, घोड्यावर स्वारीसाठी चढवावयाचे बारदान, ह्या सर्वांची त्याने कसून जुळणी केली. पोरांच्या कमरपट्ट्यांतून नक्षीदार तुर्की पिस्तुले खोचली गेली. कमरेला तलवारी लटकल्या. डोक्यावर गोंडेदार टोप्या चढविल्या गेल्या. ही सारी तयारी पाहून त्यांची आई मात्र अवाक्‌पणे अश्रू ढाळू लागली.

''झक्क तयारी झाली पोरांनो! आता वेळ न गमावता आपण निघालंच पाहिजे! पण हे पाहा, आपल्या ख्रिश्चन रिवाजाप्रमाणे निघण्यापूर्वी आपण एकत्र बसूया!'' आणि मग नोकर-चाकर, दाया-मोलकरणीसुद्धा सारी एकत्र बसली. म्हातारीने मुलांना आलिंगन दिले. त्यांच्या गळ्यात इडापिडा टळण्यासाठी ताईत बांधले. ती म्हणाली, ''बाळांनो, परमेश्वर तुम्हाला सुखी राखो!'' ''बस झालं! बस झालं!'' बुल्बा ओरडला. फाटकापाशी घोडे सज्ज होतेच. बुल्बाने प्रथम आपल्या घोड्यावर स्वारी केली. बुल्बाचा वजनदार देह पाठीवर आदळताच त्याचे घोडे नावाप्रमाणे सैतान असूनही कडमडल्यागत झाले. मग पोरेही आपापल्या घोड्यावर स्वार झाली. आता मात्र न राहवल्यामुळे मुलांची म्हातारी आई धावून पुढे आली; तिने पोरांच्या घोड्यांचे लगाम धरले. तत्काळ नोकर आले व त्यांनी म्हातारीला उचलून आत नेले. हां हां म्हणता समोर क्षितिजापर्यंत पसरलेल्या गवताळ प्रदेशातून निघालेले कोसॅक घोडेस्वार तिच्या दृष्टीआड झाले. बुल्बा आपल्या मुलांना घेऊन सेचकडे रवानाही झाला!

●●●

## २. प्रवास

तिघेही घोडेस्वार व त्यांचे अनुचर अवाक्‌पणे चालले होते. म्हाताऱ्या बुल्बाच्या मनात त्याचा भूतकाळ तरळत होता. प्रत्येक कोसॅकला आपले तारुण्य व मस्ती चिरकाल टिकावी असे वाटते. बुल्बाच्या डोळ्यांपुढे त्यांचे तारुण्य दिसत होते. त्या नुसत्या स्मृतीनेच त्याच्या डोळ्यात अश्रू तरळले. सेचला पोचल्यावर आपल्या जुन्या

सहकाऱ्यांपैकी कोणकोण भेटू शकतील, याचाही विचार त्याच्या मनात डोकावत होता. त्याचे काही सहकारी त्याच्या डोळ्यादेखत मरण पावले होते. जे हयात होते, त्यांपैकी कोण कशा अवस्थेत भेटतील ह्याबद्दल त्याच्या मनात संदेह होता. डोळ्यात उभ्या राहिलेल्या अश्रूंनी त्याची दृष्टी मंदावली होती. गत तारुण्याच्या स्मृतीने व झालेल्या दु:खाने मस्तक लवले होते.

त्याच्या दोन मुलांच्या मनात निराळेच विचार चालू होते. वयाच्या बाराव्या वर्षी त्यांना कीव्ह येथील विद्यालयात घालण्यात आले होते. तोपर्यंत त्यांची वाढ सर्वच कोसॅक मुलांप्रमाणे स्वैर व स्वच्छंदी झालेली होती. थोरल्या ओस्टापने पहिल्याच वर्षी विद्यालयातून पळ काढण्याचा प्रयत्न केला आणि भरपूर फटकेही खाल्ले. त्यानंतर त्यांनी पुस्तके गहाळ करण्याचा सपाटा चालविला. हे शिक्षण नित्य जीवनक्रमाशी सुसंगत नसल्याने त्याचा उपयोग नाही, हे बुल्बा स्वत:च बडबडे. पण प्रत्यक्ष मुलांना मात्र विद्यालयात कोंबण्याबद्दल उत्सुक असे. मुले कीव्हला विद्यालयात शिकतात, एवढ्या एकाच गोष्टीमुळे आपली पत वाढते, अशी त्याची कल्पना होती. तत्कालीन विद्यालयांत शिक्षक मुलांना फटके मारून वठणीवर आणण्यात तरबेज असत. बसलेल्या फटक्यांमुळे आपल्या तंगड्या कशा हुळहुळत व आपण त्या विजारीवरून कशा खांजाळीत असू ह्याची आठवण ओस्टापला येत होती. 'अकलेपेक्षा ह्यांची फटक्यांवरच मदार जास्त!' तो मनातल्या मनात म्हणत होता.

त्याचा धाकटा भाऊ अशाच विचारात गढला होता. त्याची अभ्यासात कधीच कसूर नव्हती. त्याचबरोबर तारुण्यसुलभ उनाडपणा करण्यातही तो काही कमी नव्हता. वयाची विशी गाठीपर्यंत काही विशेष घडले नाही. मग मात्र नव्या कल्पनांचे थैमान त्याच्या डोक्यात चालू झाले. कीव्ह शहरातील सधन वस्तीमधून उगीच हिंडावे, विशेषेकरून पोलिश वा रशियन सरदार-दरकदार ज्या विभागात राहात, त्या विभागात हिंडून तेथे आढळणाऱ्या तरुण सौंदर्याचा दृष्टीलाभ मिळवावा, हा त्याचा नित्यक्रम झाला होता आणि मग त्याला काही वेचक प्रसंगांची स्मृती होऊ लागली.

एके दिवशी सौंदर्यनिरीक्षणासाठी त्या विभागात हिंडत असता एका सरदाराची घोडागाडी टाप् टाप् करीत भरवेगाने आली. वाटेने रेंगाळत वेंधळेपणाने चाललेला हा तरुण पाहून पुढील पेटीवर बसलेल्या सईसाने आपल्या हातातील कमचीचा एक फटकारा जाता जाता त्याच्या अंगावर ओढला. या अपमानाने भडकलेल्या अँड्रीने आपल्या पोलादी हातांनी गाडीच्या मागील चाकाचे आरे असे मजबूत धरले, की गाडी एकदम खाड्कन उभीच राहिली. सईसाला कळून चुकले, की आता आपणावर काही ना काही आपत्ती येणार. त्याने घोड्यांच्या पाठीवर चाबकाने असे काही फटकारे ओढले, की घोडे ताडकन् उसळले व भरधाव निघाले. एकदम बसलेल्या हिसक्यामुळे अँड्रीचे हात सुटले व तो रस्त्यात सपशेल पालथा पडला. कोणाच्या तरी मधुर हास्यरवाने तो गडबडून उठला व इकडे तिकडे पाहू लागला. समोरच्या प्रासादाच्या माडीवरील खिडकीत उभी असलेली एक पोलिश तरुणी त्याची ही फजिती पाहून खदखदून हसत होती. तिचे तारुण्य व सौंदर्य पाहून स्तिमित झालेला अँड्री आपली फजिती विसरून तिच्याकडे टक लावून पाहू लागला.

पुढे काही दिवसांनी एके रात्री तेथील बगीच्यातील एका मोठ्या वृक्षावर चढून त्याने बेधडक खिडकीवाटे त्या तरुणीच्या खोलीत प्रवेश केला होता. तिने आरडाओरडा केला नाही, पण आपल्या तार्तर दाईकरवी त्याची बाहेर रवानगी केली. प्रासादाबाहेर पडताना मात्र तिच्या नोकरांनी त्याची कणीक चांगलीच तिंबली.

पुढे एके प्रसंगी ती कॅथलिक धर्ममंदिरात जात असताना तिने अँड्रीकडे पाहून मधुर स्मित केले होते. त्या स्मिताचा आधार घेऊन अँड्री फिरून एकदा तिच्या प्रासादाकडे गेला, पण ह्या खेपेस मात्र ती तरुणी दृष्टीस न पडता, दुसराच एक कुरूप चेहरा त्याच्या दृष्टीस पडला. अँड्री निराश झाला. चौकशी केल्यानंतर त्याला कळले की, या विभागाच्या पोलिश अधिकाऱ्याची ती मुलगी होती आणि तो बदलून गेल्याने, ते सारे कुटुंब कोठे गेले हे कळण्यास मार्ग नव्हता. ह्या सर्व घटना मुकाट्याने चाललेल्या अँड्रीच्या डोक्यात आता घोळत होत्या. गवताळ प्रदेशातील गवताची उंची पुढे पुढे जावे तशी वाढू लागली होती. प्रवास करणाऱ्या

घोडेस्वारांच्या आता टोप्याच काय त्या फक्त दिसत होत्या.

''एऽ पोरांनो, असे मुकाटवाणी काय चालला आहात?'' आपल्या तंद्रीतून जागा झालेला बुल्बा एकदम ओरडून म्हणाला, ''तडीतापसी निघाल्याप्रमाणे हा मुका प्रवास काय कामाचा? काढा, आपल्या चिलमी बाहेर काढा! चार झुरके मारून द्या घोड्याला टाच. घोडी गरुडभरारीने उधळली पाहिजेत!'' मग सर्वांनीच घोड्याला टाच दिली. गवताच्या अथांग समुद्रात ते दिसेनासे झाले. घोड्यांच्या टापांखाली दबलेल्या गवताचा एक पट्टा उठे आणि त्यामुळेच त्यांचे अस्तित्व जाणवून येई.

सूर्य आता बराच वर आला होता. आकाश निरभ्र होते. तो गवताळ प्रदेश सूर्याच्या तळपत्या उन्हात न्हाऊन निघाला होता. त्या सुंदर वातावरणामुळे कोसॅक घोडेस्वारांचा आनंद, उल्हास उचंबळू लागला होता.

जसजसे पुढे जावे, तसतसे त्या गवताळ प्रदेशाचे सौंदर्य वाढू लागले. जमिनीला अद्यापि नांगराचा स्पर्शही झाला नव्हता. नोव्होर्शियाचा गवताळ प्रदेश पार दक्षिणेस काळ्या समुद्रापर्यंत हजारो मैल पसरलेला होता. या हिरव्यागार सागरावर वाऱ्यामुळे असंख्य लाटा हेलावत होत्या. या प्रदेशाइतका सुंदर निसर्ग जगात अन्यत्र कोठेच आढळणे शक्य नाही! ताडमाड वाढलेल्या या नाजूक गवताच्या शेंड्यांवर असंख्य रंगांची फुले उमलली होती. अनेक पक्षांचे व कीटकांचे थवे या तृणभूमीच्या आश्रयाला राहिले होते. त्यांच्या अनेकविध आवाजांनी सारा प्रदेश हेलावून गेला होता.आकाशातून भराऱ्या मारीत जाणारे पक्ष्यांचे थवे डोळ्यांचे पारणे फेडीत होते. लांब दूरवर कोठे तरी एक निळसर पट्टा दिसत होता. बहुधा ती नीपर नदीच्या काठावरील दाट झाडी असावी.

आमचे प्रवासी अधूनमधून काही काळ भोजनासाठी थांबत. बुल्बाने आपणाबरोबर आणलेले सुमारे दहा कोसॅक सेवक मग जेवणाच्या तयारीस लागत. लाकडी बुधल्यांतील व्होडका बाहेर काढली जाई. पडशीतून गव्हाचे रोट बाहेर निघत. रोटांना मुरंबा फासला जाई आणि मग जेवणाच्या शेवटी एखादा प्याला व्होडका मद्य झोकले जाई. प्रवासात असताना माफक मद्यप्राशन केले पाहिजे, असा बुल्बाचा दंडक होता.

नंतर मग सायंकाळ येई. एखाद्या प्रचंड कुंचल्याने रंगकाम करावे, त्याप्रमाणे क्षितिजावर सोनेरी रंगाचे फटकारे मारले जात. गवताळ प्रदेशातील सायंजीव सृष्टी जागी होऊ लागे. टोळांचे गुणगुणणे, रातकिड्यांची कर्कश्श किरकिर आणि दूर कुठल्यातरी सरोवरात डुंबून परत निघालेल्या हंसथव्याच्या पंखांची फडफड, ह्यांचा एक संमिश्र नाद वातावरणात भरून जाई.

मग कोसॅक प्रवासी रात्रीच्या मुक्कामासाठी खुली जागा पाहून थांबत. लाकडी तिकाटण्यावर तांब्याची भली मोठी हंडी टांगली जाई व रात्रीचे जेवण शिजविण्याचे काम होई. गवताळ प्रदेश धुक्यात गुरफटल्यासारखा अंधुक दिसू लागे. सर्वत्र प्रगाढ शांतता असल्याने कीटकसृष्टीचे स्वरही कर्णकटू भासत. या उघड्या मैदानात आमचे हे कोसॅक प्रवासी उताणे पसरून निद्राधीन होण्याचा प्रयत्न करीत. निरभ्र आकाशात चांदण्यांची लुकलुक चालू असे. कोठून उठलेले काजव्यांचे थवेही लुकलुक करीत तरंगत तरंगत निघून जात आणि हे सारे पाहाता पाहाता कोसॅक प्रवासी केव्हा झोपी जात, हेच कळत नसे.

असा प्रवास सातत्याने काही दिवस चालू होता. अमर्याद अशा ह्या गवताळ प्रदेशातील हा प्रवास असाच अनंतकाळ चालला तरी हवासा वाटावा, असेच ह्या प्रदेशाचे सौंदर्य प्रलोभनीय होते. मार्गात कोणताच साहसप्रसंग न उद्भवल्याने प्रवासाची गोडी अवीटच राहिली.

एके दिवशी दूरवर दिसणाऱ्या एका ठिपक्याकडे बोट दाखवून बुल्बा ओरडला, ''पाहा, पाहा पोरांनो, तार्तर चालला आहे!'' त्याच्या ओरडण्याने तार्तर थबकला. पोरांना त्या ठिपक्यावर लुकलुकणारे डोळे दिसू लागले. चपट्या चेहेऱ्याचा व तुरळक मिशांचा तार्तर तोंडावळा त्या ठिपक्यांच्या ठिकाणी त्यांना दिसून आला आणि मग एखाद्या काळविटाप्रमाणे त्या तार्तर मनुष्याने घोडदौड केली. गवताच्या हालचालीवरून त्याच्या गतीची कल्पना येत होती. ''वाह वा! मुलांनो, हा माणूस कधीच तुमच्या हाती लागणे शक्य नाही! त्यांची घोडीच मोठी चपलख असतात!'' बुल्बाने खुलासा केला.

कदाचित हा तार्तरी माणूस आपल्या जातभाईंना गोळा करून काही आपत्ती आणेल या भीतीने कोसॅक प्रवाशांनी

आपले घोडे दामटले. सतत प्रवास चालू होता. वरील घटनेनंतर तीन दिवसांनी बुल्बा आपल्या लवाजम्यासह मुक्कामाच्या जवळजवळ येऊन पोचला. हवेतील बदल त्यांना एकदम जाणवू लागला. वातावरणात एकदम गारवा आला होता. नीपर नदीच्या सान्निध्यात आल्याचा तो परिणाम होता.

नीपर नदीच्या किनाऱ्यावर आल्यानंतर सर्व प्रवासी घोड्यांवरून खाली उतरले. नदीपार होण्यासाठी ते आपल्या सर्व लवाजम्यासह एका प्रचंड नौकेवर चढले. सेच, अर्थात लष्करी विद्यालय - पैलतीरावरच वसले होते. वस्तीत शिरताच कानठळ्या बसविणारा घणांचा आवाज त्यांच्या कानी आला. लोहारांच्या पाचपन्नास झोपड्यांमधून हत्यारे घडविण्याचे काम चालू होते. भट्ट्या धगधगत होत्या. घाऽण् घाऽण् करून घण ऐरणीवर बडविले जात होते.

जरा पुढे गेल्यावर चर्मकारांची वसाहत लागली. कातडी कमावण्याचे, त्यांच्या विविध वस्तू बनविण्याचे त्यांचे काम तन्मयतेने चालले होते. त्याच्या पलीकडे युद्धसाहित्य विकणाऱ्या व्यापाऱ्यांची छोटी छोटी दुकाने होती. गारगोट्या, पोलादाचे तुकडे, बंदुकीची दारू, तलवारी अशा अनेक चिजा ह्या दुकानांतून विक्रीसाठी ठेविल्या होत्या. जवळच एका अर्मेनियन व्यापाऱ्याचे रंगीबेरंगी हातरुमाल विक्रीचे दुकान दिसत होते. त्याच्याच शेजारी एका तार्तरी माणसाचे उपाहारगृह असून तो विक्रीसाठी मासाचे तुकडे तळीत बसला होता. एके ठिकाणी एक ज्यू आपल्या गुत्त्यात बसून लाकडी पिंपातील व्होडका गिऱ्हाइकांना काढून देण्यात गुंतला होता.

येथे एक आंतराष्ट्रीय बाजारपेठच वसली होती असे म्हणण्यास मुळीच हरकत नाही. पण बुल्बाला सर्वांत जास्त कौतुक कशाचे वाटले असेल तर ते एका झापुर्झियन कोसॅकचे होय!

''वाह काय गड्याचा दिमाख आहे!'' तो म्हणाला. हा कोसॅक भर दिवसा रस्त्यात एखाद्या सिंहाप्रमाणे पसरला होता. लांबलचक हातपाय पसरून खुशाल झोपी गेला होता. त्याच्या डोकीचे काळेभोर केस अस्ताव्यस्त पसरले होते. त्याचा भला मोठा चोळणा वंगणाने डागळला होता. धुळीने माखला होता. हा माणूस उंची कपड्यांना किती तुच्छ लेखीत असावा, ह्याचा तो पुरावाच होता. विशाल देह, बेफिकीर मुद्रा व झोपण्याची ही तऱ्हा पाहून बुल्बा बेहद्द खूश झाला होता. थोडे पुढे गेल्यानंतर कोसॅक लोकांच्या झोपड्या आढळल्या. झोपड्यांची छपरे गवताची अगर तार्तरी लोकांप्रमाणे चामड्यांनी मढविलेली दिसत होती. काही झोपड्यांजवळ तोफाही ठेवलेल्या दिसत होत्या. येथून जवळच गिड्डी छपरे असलेल्या अनेक इमारती दिसत होत्या. इमारतींभोवती कुंपणवजा काही रचना केलेली दिसत होती, पण बंदिस्त पहाऱ्याचा मागमूसही तेथे दिसत नव्हता. काही तगडे कोसॅक आळसटपणाने चिलमी फुंकीत इकडेतिकडे उगीच तरंगताना दिसत होते.

ह्या गर्दीतून आपल्या लवाजम्यासह वाट काढीत बुल्बा संथ गतीने चालला होता. अधूनमधून कोणाला तरी उद्देशून तो ''सुप्रभातम्!' म्हणे व संबंधी झापुर्झियन कोसॅककडून त्याला प्रतिसाद मिळे. आता ते झापुर्झीच्या सेचमध्ये येऊन दाखल झाले होते. सिंहाप्रमाणे पराक्रमी व मजबूत असलेल्या कोसॅकांचा खराखुरा तळ म्हणजे झापुर्झी व तेथील लष्करी विद्यालय सेच होय. आता सर्व मंडळी एका चौकात येऊन दाखल झाली होती. ही जागा कोसॅक जमातीच्या सर्वसाधारण सभेसाठी राखून ठेवण्यात आली होती. येथे उपड्या टिपावर बसून एक भला मोठा कोसॅक आपल्या अंगरख्यातील छिद्रे शिवीत होता.

चौकात आल्यानंतर फिरून त्यांचा मार्ग गर्दीने अडविला गेला. वादकांचा एक थवा अनेक वाद्ये तन्मयतेने वाजवीत होता. मेंढीच्या कातड्याचे कुडते घातलेला एक कोसॅक जवान वाद्यवृंदाच्या तालावर नृत्य करण्यात गढला होता. नृत्याच्या बेहोषीत त्याने चालविलेली हालचाल, अंगविक्षेप मोठे उन्मादकारक होते. ''टप् टप्-खड् खड्'' त्याच्या पायातील जाड खिळ्यांचे बूट वाजत होते. सारे वातावरण तालबद्ध लयींनी धुंद झाले होते. हळूहळू असंख्य कोसॅक सभोवार गोळा होऊ लागले.

नर्तकाचे केस वाऱ्यावर भुरभुर उडत होते. अंग घामाच्या धारांनी निथळत होते.

''अरे एऽ शहाण्या, अंगातलं कुडतं काढून टाक! तू घामानं निथळत आहेस.'' बुल्बा ओरडला.

''ते शक्य नाही!'' नर्तक नाचता नाचताच ओरडला.

''का?''

''आतापर्यंत कपडे विकूनच व्होडका प्यालो, आता एवढं कुडतंच काय ते शिल्लक आहे!''

गर्दी वाढतच होती. अनेक लोक स्वयंस्फूर्तीने नृत्यात सामील होत होते.

''मी घोड्यावर नसतो तर नृत्यात नक्कीच सामील झालो असतो!'' बुल्बा म्हणाला.

''ओहो तारस, कुठून आलास? केव्हा आलास?''

''कसं काय? बरं आहे ना?''

''कोण? किरगाया, तू का? ठीक चाललं आहेन ना?'' अशा अनेक प्रश्नोत्तरांची देवाण-घेवाण चालू झाली. कारण गर्दीत बुल्बाला जुन्या परिचयाचे अनेक कोसॅक भेटू लागले होते. तार्तर लोकांकडून मारल्या गेलेल्या अनेक मित्रांची वार्ताही त्याला येथे कळू लागली.

''अरेरे! उमदे कोसॅक गडी अशा रितीने मारले गेले काय? पाहून घेऊ! पाहून घेऊ!'' बुल्बा त्वेषाने म्हणत होता.

●●●

## ३. सेचमध्ये

बुल्बा आणि त्याचे मुलगे यांना सेचमध्ये येऊन आता आठ एक दिवस होऊन गेले. ओस्टाप आणि अँड्री लष्करी अभ्यासक्रमाखेरीज आणखीही कित्येक व्यापांत गढून गेले. सेचमध्ये खास लष्करी अभ्यासाची तरतूद होती, असे मुळीच नाही. सेचमधील तज्ज्ञांचे असे मत होते, की तरुणांना युद्धप्रसंगातून खरे लष्करी शिक्षण मिळते; आणि त्यामुळे कवाईत व पुस्तकी पोपटपंची यांवर वेळ व श्रम खर्च करण्यास त्यांची तयारी नव्हती. युद्धप्रसंग ओढवून घेणे हा कोसॅक स्वभावधर्म असल्याने त्यांना युद्धप्रसंगांची कमतरताही सहसा भासत नसे. निशाणबाजी, घोडदौड, गवताळ प्रदेशातील पशुपक्ष्यांची शिकार, असल्या कार्यक्रमांत सेचमधील तरुण मशगुल असत. त्यांचा बराचसा वेळ रंगेल व रगेलपणा करण्यातच खर्च होई.

सेचमधील वातावरण तसे मोठे रंगेल होते. तेथे नेहमीच काही ना काही उत्सवसमारंभ चाले आणि हे उत्साही वातावरण कायम टिकून असे. स्वाभाविक अनेक लोक व्यापारासाठी येथे ठिय्या देऊन असत. कोसॅक माणसाचा खिसा सदैव रिकामा असावा असा सिद्धांतच येथे होता. हातात पैसा आला रे आला, की तो मद्यप्राशनात वा चैनीच्या वस्तू खरेदी करण्यात खर्च झालाच पाहिजे. यामुळे येथील व्यापारी खुशीत असत. पण त्याचबरोबर त्यांना दुसरीही एक जाणीव असे. ज्वालामुखीच्या पायथ्याशी बसून आपण व्यापार थाटला आहे, हीच ती जाणीव होय! कोसॅक जमातीची लहर केव्हा फिरेल व आपला व्यापारउदीम केव्हा उध्वस्त होईल, हे सांगणे त्यांचे त्यांनाच कठीण होते.

दक्षिण रशियातील बहुतेक सर्व कोसॅक जमात या ठिकाणी एकत्रित झाली होती, संघटित झाली होती. ती मद्यप्राशनात धुंद व आनंदात गुंग असे. खिशात पैसे बाळगणे येथे पाप समजले जाई. कोणाचाही खिसा उरफाटा केला, तर दमडीही बाहेर पडता उपयोगी नाही, असा येथील दंडक होता. अशा रगेल आणि रंगेल मुलुखात काळ काढण्यासाठी, लोक मुद्दाम दूरदूरहून येत. कोसॅक लोकांचा हा स्वयंशासित प्रदेश झापुर्झी म्हणून ओळखला जाई. स्त्रियांचे दर्शनही येथे दुर्मीळ होते. सेचमध्ये अगर आसपासच्या प्रदेशात फिरकण्याचे साहस कोणतीच स्त्री करू शकत नव्हती.

आपण येथे नव्याने येऊनही कोणीच आपली विचारपूस कशी करीत नाही, याचे ओस्टाप व अँड्री यांना मोठे आश्चर्य वाटत होते. कोण? कुठले? का आला? असे प्रश्न विचारण्याची उत्सुकता ते आल्यास कोणीच दाखविली नव्हती आणि त्यामुळे आपण जणू येथील मूळचेच आहोत, अशा भावनेने मोकळेपणाने त्यांचा वावर चालू झाला. आरंभाला एकदाच काय ते त्यांना सेचच्या प्रमुखांपुढे उभे राहावे लागले होते. ''सुस्वागतम्! सभ्य गृहस्थहो, तुमचा ख्रिस्तावर विश्वास आहे काय?'' त्याने विचारले.

''होय!''

''तुम्ही पवित्र त्रयीवर विश्वास ठेवता?''

''होय!''

''तुम्ही प्रार्थनामंदिरात जाता?''

''होय!''

''तुम्हाला धर्मचिन्ह माहीत आहे? करता येतं?''

''होय!''

'' ठीक आहे. तुम्हाला पसंत पडतील त्या झोपड्या घ्या व तिथे राहा!'' प्रमुख म्हणाला व सेचमधील प्रवेशाचा विधी संपला.

सेचमधील सर्वच लोक प्रार्थनेसाठी एकाच प्रार्थनामंदिरात जमत. या प्रार्थनामंदिराच्या रक्षणासाठी रक्त सांडण्यास ते सदैव सज्ज असत. कोणीही परकीय या ठिकाणी शिरण्याचे साहस करण्यास धजावत नसत.

कोणी साहसी अर्मेनियन वा तार्तर येथे येऊन व्यापार करण्याचा प्रयत्न करीत नाही, असे नाही; पण त्यापलीकडे मात्र ते इतर कशात लक्ष घालीत नसत. झापुर्झियन कोसॅक खरेदी करताना घासाघीस करीत नसत, व मालाची किंमत देताना मुठीमुठीने नाणी काढून देत. ते ती कधीच मोजीत नसत. यामुळे या वसाहतीत व्यापार करणे मोठे किफायतशीर असे. पण त्याचबरोबर हुल्लड माजल्यास आपल्या दुकानाचे तीन तेरा होण्यास वेळ लागणार नाही, हेही त्यांना माहीत असे.

ओस्टाप आणि अँड्री हे दोघेही हां हां म्हणता येथील रगेल जीवनाशी एकरूप होऊन गेले. आपले घर, आई यांचा त्यांना तत्काळ विसर पडला. येथील प्रत्येक गोष्टीत रस वाटू लागला. सेचचा सारा कारभार आणि व्यवहार तसा सुटसुटीत होता. येथे चोरी, मग ती किती का क्षुल्लक असेना, मोठे पाप मानिले जाई. चोरी करणाऱ्या कोसॅकला 'कलंकस्तंभास' जखडण्यात येई व तेथे एक सोटा ठेवून देण्यात येई. येणाऱ्या-जाणाऱ्या वाटसरूंना या कलंकित माणसाला त्या सोट्याने मरेमरेतो मारण्यास संपूर्ण मुभा असे आणि माराखाली तो बिचारा मरून जात असे. खुनी माणसाला याहूनही भयंकर शिक्षा मिळे. त्याने ज्याचा खून केला असेल त्याच्या मुडद्याबरोबर खुन्यालाही जिवंत गाडण्यात येई! ओस्टाप व अँड्री येथील हे रिवाज पाहून चकित होऊन गेले.

लवकरच ते उभयता कोसॅक जमातीत लोकप्रिय झाले. कित्येक वेळा ते आपल्या तुकडीतील सहकाऱ्यांसह अगर सर्वच तुकड्यांसह गवताळ प्रदेशात शिरत व तेथील पशुपक्ष्यांची भरगच्च शिकार करीत. नीपर नदीतील मासे अक्षरश: ढिगांनी पकडीत. त्यांचे साहस व सुदैव पाहून सर्व कोसॅक तरुणात ते प्रिय झाले होते. नीपर नदीच्या प्रवाहात उलट दिशेने पोहून जाण्याचा त्यांचा विक्रम हा सर्वांच्याच कौतुकाचा विषय झाला होता.

पण त्यांचा म्हातारा बाप बुल्बा एवढ्यावर संतुष्ट नव्हता. आपल्या मुलांच्या पराक्रमाला याहून अधिक संधी, वाव मिळाला पाहिजे, अशी त्याला रुखरुख लागली होती आणि ही संधी युद्धप्रसंगाशिवाय मिळणार नाही, याचीही त्याला कल्पना होती. एके दिवशी झापुर्झियन जमात-नेत्याकडे येऊन तो म्हणाला, ''नेताजी, असं हे किती दिवस चालणार? आम्हा झापुर्झी कोसॅकांना रणांगणावर जाण्याची संधी कधी मिळणार नाही का?'' नेत्याने तोंडात धरलेले चिलमीचे नळकुटे दूर केले. तो एकदा पच्कन जमिनीवर थुंकला व म्हणाला, ''रणांगणावर? आता रणांगण आहे कुठे?''

''का? तार्तरी लोकांवर आपण चाल करून जाऊ शकणार नाही काय?''

''कुठले तार्तरी आणि कुठले तुर्क! आपण आता कोणावरच चाल करून जाऊ शकत नाही!'' शांतपणे चिलीम तोंडात कोंबीत नेता म्हणाला.

''का नाही?''

''आपण सुलतानाशी शांतता-तह केला आहे म्हणून!''

''पण ते नास्तिक आहेत आणि नास्तिकांना शासन करावं अशी धर्माज्ञा आहे!''.

''नाही. आपणास तसं करता येणार नाही. आम्ही आमच्या धर्माचीच शपथ घेतली आहे तह करताना!''

''मी माझी तरणीताठी पोरं घेऊन इथे आलो आहे; कुणालाही अद्यापि रणांगणाचा अनुभव आलेला नाही. आम्हा झापुर्झीच्या कोसॅकांना रणांगणावर जाण्याचा हक्कच राहिला नाही काय?''

''हं! आहे हे असं आहे!''

''मग कोसॅक-सामर्थ्य जागच्या जागी सडून जावं असं तुझं म्हणणे आहे काय? आपल्या देशासाठी, ख्रिश्चन धर्मरक्षणासाठी काहीही न करता धुळीत टाचा घासून

कुत्र्याप्रमाणे आम्ही मरावं काय? म्हणे युद्ध करता येणार नाही?''

बुल्बाच्या या सरबत्तीला नेत्याने काही काळ उत्तरच दिले नाही. तो मख्खपणाने बसून राहिला व नंतर शांतपणाने म्हणाला, ''ते मला ठाऊक नाही, लढाई होणार नाही, एवढं मात्र खरं!''

''काय? युद्ध होणारच नाही?''

''नाही.''

''भेकड कुठला!'' बुल्बा मनातल्या मनात म्हणाला, ''भागूबाई, तुला दाखवतोच इंगा!'' जाता जाता ह्या नेत्याची खोड मोडण्याचे त्याने ठरविले.

अलीकडे बुल्बा अनेक कोसॅकांची दोस्ती करताना दिसू लागला. त्यांना मनमुराद व्होडका पाजू लागला. अनेक चाहत्यांचे टोळके त्याच्या भोवती जमू लागले. असाच एके दिवशी व्होडका पिऊन धुंद झालेल्या कोसॅक टोळक्यासह बुल्बा जमातसभेच्या चौकात आला.

जनसभा बोलाविण्यासाठी वाजविण्यात येणारी भेरी एका स्तंभावर लटकत होती. भेरीवाला तिच्या टिपऱ्या घेऊन कोठेतरी पांगला होता. बुल्बाने हुडकाहुडकी करून दोन टिकारणी पैदा केली व भेरी वाजविण्यास सुरुवात केली. भेरीचा आवाज ऐकताच, मद्याने झिंगलेले डोळे घेऊन भेरीवाला धावतच तेथे आला.

''आँऽ, लेकाच्यांनो, उगीच का बडवताय भेरी?'' तो ओरडला.

''गप्प बैस! जादा वटवट बंद कर! आणि मुकाट्याने भेरी वाजव!''

या टोळक्याची आज्ञा मोडल्यास आपली काय अवस्था होईल याची भेरीवाल्यास कल्पना असल्याने, त्याने आपल्या चोळण्याच्या खिशातून टिपऱ्या बाहेर काढल्या व भेरी वाजविण्यास सुरुवात केली.

''धिमीऽ धिमीऽ धिमीऽ धिमीऽऽ धिमीऽऽ धिम्'' भेरीचे गंभीर नाद निनादू लागले. आग्यामोहोळ जमावे, त्याप्रमाणे हजारो कोसॅक चौकात जमू लागले. जमातीचा नेताही उपस्थित झाला. त्याने आपली टोपी काढून जमातीला अभिवादन केले व म्हटले, ''काय रे गड्यांनो, आज ही जमातसभा का बोलावली आहे?'' त्याच्या चेहेऱ्यावर स्मित दिसत होते.

पण जमावातून धिक्काराच्या आरोळ्या उठल्या, शिव्यांचा भडिमार चालू झाला. ''तो मानदंड आधी खाली ठेव!'' ''सैतानाचा बच्चा तू!'' ''नेता झालाय मोठा! खड्ड्यात घाला हा मरतुकडा नेता!...'' गलका वाढू लागला.

काही लोकांना हा आततायीपणा मान्य झाला नाही. त्यांनी आपली नापसंती व्यक्त करताच धक्काबुक्कीला सुरुवात झाली. नेत्याने मानदंड खाली टाकला व हळूच गर्दीत पळ काढला. त्याच्या मनात जमावाला उद्देशून काही बोलावयाचे होते. पण तसा काही प्रयत्न केल्यास लाथा खाव्या लागतील हे ओळखून त्याने पळ काढला.

''सद्‌गृहस्थहो, आम्हीही आमच्या जागा खाली कराव्यात काय?'' न्यायाधीशाने पुढे येऊन विचारले.

''नाही. त्याची जरूर नाही!'' जमाव ओरडला.

''आम्हाला फक्त नवा नेता निवडायचा आहे! हा बायल्या नेता आम्हाला नको आहे!''

''कोसॅक जमातीचं नेतेपण हा माकडीचा काय करणार?''

''मग आपल्याला नवा नेता कोण हवा?''

''कुकुबेंकोला निवडा!'' काही ओरडले.

''कुकुबेंको! छे! ते कालचं पोर! अजून अंगावर पितंय्!''

''शिलो! शिलोला निवडा!''

''ती खुळ्याची अवलाद? दारुड्या तो! त्याला कोण कुत्रं तरी विचारील का?''

''तो कोसॅक आहे का तार्तर!''

''त्याला ये म्हणावं पुढे. टाळकंच फोडतो!''

''बोरोडी! बोरोडी!!''

''बोरोडी? शंख वाजवा आता!'' गर्दीतून आवाज उठला.

''किरीगायाला निवडा!'' बुल्बाने त्याच्या सूचनेवरून आरडाओरड करणाऱ्या टोळक्याला सुचविले.

''किरीगाया! किरीगाया!'' टोळक्याने आरडा केला.

''शिलो! शिलो!''

''खड्ड्यात गेला शिलो!''

''किरीगाया! किरीगाया!''

किरीगायाच्या नावाचा ओरडा बेताबेताने वाढू लागला. मग खूप ठोसाठोशी, गुद्दागुद्दी झाली आणि शेवटी किरीगायाखेरीज कोणाच्याच नावाचा पुकारा ऐकू येईनासा झाला.

''ठीक आहे. ठीक आहे. आणा पुढे किरीगायाला!'' आणि मग दहा-वीस कोसॅकांनी किरीगायाला खेचीत पुढे आणले. हे करीत असताना व्होडका ठासल्यामुळे त्याचे सारखे झोक जात होते.

''आंऽ लेकाच्यांनो, मला का ओढता? नसता जुलूम!'' किरीगाया कोकलत होता.

''गप्प बस! लेका, तुला नेता केलाय्!''

''मला नको तुमचं नेतेपण!''

''जा गधड्या, हो पुढे! आयता मान चालून आलाय्, आता शेपूट घालून मागे सरलास तर लाथाच घालू बघ!'' आणि मग ढोसलीत, लाथाबुक्क्या घालीत, ह्या टोळक्याने किरीगायाला पुढे आणून जेमतेम उभे केले.

''सद्‌गृहस्थहो, तुम्ही निवडलेला नेता तुमच्या पुढे आणून हजर केला आहे!'' त्या टोळक्याचा म्होरक्या जमावाला उद्देशून म्हणाला, आणि मग किरीगायाचे नेतेपण जाहीर करण्यात आले. आपणास नेतृत्व दिल्याबद्दल किरीगायाने कोसॅक जमातीचे आभार मानले आणि मग नेतानिवडीचा हा धुडगूस कार्यक्रम संपला.

या निवडीने बुल्बा खुशीत होता. युद्ध न करणाऱ्या पहिल्या नेत्याची त्याने मोठ्या युक्तीने खोड मोडली होती.

नव्या नेत्याच्या निवडीचा आनंदोत्सव चालू झाला. गुत्त्यातील मद्याची पिंपे कोरडी झाली. दिडकीची मिळकत झाली नाही तरी जिवंत सुटायला मिळाले, एवढ्यावरच गुत्तेवाले खूश होते.

सारी रात्र नाच, गाणी, पोवाडे यांचा धुडगूस चालू होता. झापुर्झियन कोसॅकांच्या मर्दुमकीचे पोवाडे निनादत होते. मद्य संपले. वादक, नर्तक, शाहीर झिंगले. धुडगुसाचा भागोटा आला आणि मग जागा मिळेल तेथे कोसॅक कलंडू लागले, निद्राधीन होऊ लागले. घोरण्याचा एकच सूर रात्रीच्या शांत वातावरणात घुमू लागला.

आकाशात चंद्र बराच वर आला होता. त्याचा शुभ्र प्रकाश हळूहळू नीरव होऊ लागलेल्या या कोसॅक वसाहतीवर पसरला होता. अद्यापि मधून मधून संगीताचे, तंतुवाद्यांचे मंद स्वर कोठून तरी कानी येत होते.

एकटा बुल्बा अद्यापि जागा होता. आज त्याने फड मारला होता. सारी कोसॅक जमात, तहनाम्याचे निमित्त पुढे करून आळसात पाडून ठेवणारा, आंबवून टाकणारा पुढारी त्याने आज नामोहरम करून टाकला होता. रणचंडी जागी होण्याची शक्यता त्याने निर्माण केली होती. त्याच्या मुलांच्या भवितव्याचा मार्ग मोकळा होऊ लागला होता.

●●●

### ४. रणांगणाकडे

बुल्बा आता आपल्या नव्या नेत्याबरोबर किरीगायाबरोबर, झापुर्झी कोसॅकांना कसे व कोणत्या रणांगणात उतरवावे, याची चर्चा करीत होता. पण किरीगायाही काही कच्च्या गुरूचा चेला नव्हता. तो टोलवाटोलवी करीत म्हणत होता, ''-पण कोणत्याही परिस्थितीत आपण दिलेली शपथ मोडणं ठीक होणार नाही!'' नंतर काही वेळ थांबून तो म्हणाला, ''त्यातूनही काही मार्ग काढता येईल! बुल्बा, त्यासाठी जनसभा बोलावली पाहिजे; पण ती मी मात्र बोलावणार नाही. ती आपणहून भरावी, अशी काही शक्कल काढ! अशा सभेत मी येईन. पण मी सभा बोलावली, असं मात्र भासता उपयोगी नाही. मग पाहू काही शक्कल निघते का!''

यानंतर कलाकभरानेच भेरी निनादू लागली. तिचा घनगंभीर आवाज ऐकून हजारो कोसॅक गोळा होऊ लागले. ''ही काय भानगड? आता ही आणखी जनसभा कशासाठी?'' अशी कुजबुज सर्वत्र ऐकू येऊ लागली.

''आम्हा कोसॅक लोकांची शक्ती आंबून चालली आहे!''

''आमचे पुढारी आळशी बनले आहेत!''

''नुसतं बसून खाल्ल्यामुळे त्यांच्या डोळ्यावर चरबी वाढली आहे!''

तावातावाने काही कोसॅक गलका करू लागले. प्रथम काही लोक तक्रारी नुसत्या ऐकत होते, पण मग तेही तक्रारी करू लागले. ''खरं म्हणजे जगात न्यायच राहिला नाही.'' कोणी म्हणाले.

एवढ्यात नेता काही म्होरक्यांना घेऊन तेथे आला व म्हणाला, ''बंधू हो, मी काही भाषण करावं काय?''

'' अवश्य करावं. नको कुणी म्हटलं?'' कोणीतरी ओरडले.

'' कोसॅक बंधूनो!''

''का ऽऽ य?''

''माझ्या बोलण्याचा उद्देश असा आहे,..''

''कसा आहे?''

''म्हणजे मला असं सांगायचं आहे, की आमच्या तरुण मुलांना अद्यापि लढाई म्हणजे काय हे माहीत नाही. तलवार कशी चालवावी याची कल्पना नाही. लढाई मारायला मिळाली नाही, तर ती शिकणार तरी काय? आणि मग आपण तरी झापुर्झियन कोसॅक कसले?''

''गड्यानं सूर तसा बरा लावला आहे!'' बुल्बा मनात म्हणाला.

''पण सद्गृहस्थ हो, दिलेल्या वचनाप्रमाणे आपल्याला लढाई तर करता येणार नाही. मग या तरुण पोरांचं काय करावं, हा एक मोठाच प्रश्न उभा राहातो!''

''छाऽ! बेटा बारगळतोय् वाटतं!'' बुल्बा चमकून उद्गारला.

''मला वाटतं, त्यांना अँतोलियाच्या किनाऱ्यावर पाठवावं. तिथे काही तरी धडपड करतील!''

''ठीक आहे! ठीक आहे!!'' गर्दीतून एकच ओरडा झाला.

''आम्ही आमच्या धर्मासाठी मरण्यास तयार आहोत!''

हा आरडाओरडा ऐकून तो लुच्चा नेता जरा विचारातच पडला. झापुर्झीची सर्व कोसॅक जमात रणक्षेत्रासाठी उत्सुकली आहे, याची संपूर्ण कल्पना त्याला आली. पण केलेला शांतता-तह मोडावा, असे त्यास मनापासून वाटत नव्हते, म्हणून त्याने विचारले, ''मी आणखी थोडा वेळ भाषण करू काय?''

''नको! नको! झालं एवढं प्रवचन बस झालं!'' बुल्बाने व त्याच्या जवळ बसलेल्या कोसॅकनी एकच ओरडा केला व त्याचाच प्रतिध्वनी सर्वत्र उठला.

''जनतेचा आवाज हाच परमेश्वराचा आवाज आहे! तुम्ही सांगाल ते मानणे माझं कर्तव्य आहे. आमच्या तरुण पोरांनी कुजत, आंबत पडावं, असं मलाही वाटत नाही, पण त्याचबरोबर निष्कारण कुरापत काढावी, असंही मला वाटत नाही. पण मी काय, तुमचा बंदा गुलाम आहे, त्यामुळे तुम्ही जो निर्णय कराल, त्याप्रमाणे मी जरूर वागेन!''

मग लोक पांगून टोळक्या-टोळक्यांनी बसकण मारून बसले व खलबते करू लागले. डोकी खाजवू लागले. उठावणी कोठे, कशी करावी, याबद्दल घासाघीस करू लागले.

आणि याच वेळी नीपर नदीतून एक प्रचंड नौका किनाऱ्यावर येताना दिसू लागली. या नौकेत असंख्य उतारू दाटीवाटीने बसले होते व गलका करीत होते. हा काय प्रकार आहे, हे पाहाण्यासाठी सारेच किनाऱ्याकडे धावले.

नौकेतील लोक किनाऱ्यावर गोळा झालेल्या लोकांकडे पाहून हातवारे करीत होते, ओरडत होते. त्यांच्या अंगावरील कपडे फाटले होते. एका सदऱ्याखेरीज कपडाही त्यांच्या अंगावर दिसत नव्हता. महान् संकटात सर्वस्व गमावून आल्याप्रमाणे या कोसॅकांची अवस्था दिसत होती. अंगातील फाटका सदरा व तोंडातील नळकंडी चिलीम, याखेरीज त्यांच्यापाशी दुसरे काहीच दिसत नव्हते. कोणत्या तरी भयंकर आपत्तीमधून सुटून आल्याप्रमाणे त्यांची एकूण अवस्था होती. नौका किनाऱ्याजवळ येताच, किनाऱ्यावर उभा असलेला नेता ओरडला, ''हा लेकाच्यांनो, अरंऽ काय? वंगाळ वार्ता काय?''

''लई म्हंजे लई खराब वार्ता!'' नावेतील लोक ओरडले.

''अर्रऽ पण काय् सांगा की!''

''अरं झापुर्झी मर्दांनो, आमाला जरा बोलू तरी द्या की!''

''आऽ ल्येको, बोला की, कुणी बंदी केलीय?''

'' मग बोलवा जनसभा!''

''समदं गडी तर हतंच हैत. अन् सभा कसली बोलावताय्?''

''अन् अजून तुम्हाला काय बी कळलं नाय?''

''आरच्च्या! सांगा की बेट्यांनो काय ते. आम्हाला काय बी ठावं नाय!''

''काय बी ऐकू आलं नाय! अरंऽ, तार्तऱ्यांनी तुमच्या कानात गुड्या हाणल्या आहेत काय?''

''अरंऽ, बाबांनो, सांगा की एकदा काय ते!''

''कुत्र्या-मांजराची दशा आली रे मर्दांनो आमच्यावर!''

''आंऽ!''

''आमची देवळं बुडाली! ती आमच्या हातनं गेली!''

''ते का?''

''ज्यू लोकांनी गहाणवट घेतली. आधी पैका द्या अन् मग प्रार्थनेला या म्हणतात!''

''येडीच माणसं दिसत्यात, काय बी सांगत्यात!''

''इस्टरच्या रोटीला ज्यूचा हात लागतोय आधी!''

''लई खोटं सांगत्यात ही मानसं!''

''यातलं अक्षरन् अक्षर खरं हाय! युक्रेनमध्ये धुडगूस झालाय. रोमन पाद्र्यांच्या गाड्या सारीकडे फिरताहेत, त्यांच्या गाड्यांना घोडे जुंपत नाहीत. आमची जुन्या धर्ममतांची माणसं जुंपताहेत! सारीकडे ज्यूंचा धुडगूस चालू आहे. साऱ्या युक्रेनमध्ये जुलूम मातला आहे, अन् तुम्ही झापुर्झीवाले इथे आळसात बसून इचारता, काय झालं? कसं झालं? तार्तरी लोकांनी तुमची घाबरगुंडी केली आहे आणि म्हणून तुम्हाला कान असून ऐकू येत नाही नि डोळे असून दिसत नाही.''

ही सारी वादावादी ऐकत उभा असलेला नेता ओरडला, ''थांबा, थांबा! तुम्ही आम्हाला हिणवता, पण तुम्ही स्वत: काय करत होता?'' तुमच्यापाशी तलवारी होत्या ना? मग तुम्ही हा धुडगूस चालू कसा दिलात?''

''अरे येऽ सोद्या, सांगणं सोपं आहे. आम्हीही कोसॅकच आहोत! पण पन्नास हजार पोलिश सैनिकांनी घाला घातल्यानंतर  आणि त्यांना आमच्यातील काही कुत्रे सामील झाल्यानंतर आम्ही काय करणार?''

''तुमचे म्होरके, तुमचे लष्करी अधिकारी काय करीत होते?''

''आमच्या म्होरक्यांची हाडं त्यांनी वार्सात तांब्याच्या हंड्यात शिजत लावली आहेत! आमच्या अधिकाऱ्यांचे तोडलेले हात गावोगाव दहशत बसविण्यासाठी त्यांच्याकडून नाचविले जात आहेत!''

हे शब्द ऐकताच तो सबंध जमाव थरारला, जिवंत झाला. आतापर्यंत चाललेला गोंधळ एकदम नष्ट झाला. त्यांच्या त्वेषयुक्त आरोळ्यांनी सारा नदीकिनारा दुमदुमून गेला. ''काय! आमची देवळं ज्यूंकडे गहाण पडली? आमचे बांधव घोड्याप्रमाणे गाड्यांना जुंपले गेले! रशियन भूमीवर असा नंगा नाच चालू झाला आहे! हे चालणार नाही! कदापि चालू दिलं जाणार नाही!'' झापुर्झियन कोसॅक क्रोधाने खवळून उठले. त्यांचे सुप्त सामर्थ्य उसळून उठलं.

हां हां म्हणता पोलिश लोकांवर हल्ला चढविण्याच्या गोष्टी सर्वत्र बोलल्या जाऊ लागल्या. घोडे, बैलगाड्या, हत्यारे-पात्यारे यांची जुळवाजुळव चालू झाली. झापुर्झियन सैनिक तयार होऊ लागले. झेप घेण्यासाठी आसुसल्यागत झाले. पोलंडच्या मुलुखात शिरून सूडाचा वणवा भडकविण्यासाठी कटिबद्ध झाले.

हुकूम सुटू लागले. सैनिकांच्या तुकड्या जमा होऊ लागल्या. नेता झालेला किरीगाया सांगू लागला, ''प्रत्येक गोष्टीकडे काळजीपूर्वक लक्ष द्या, बैलगाड्यांचे तांडे सज्ज करा, वंगणाच्या मडक्यांसुद्धा हरएक गोष्ट सिद्ध ठेवा. अन्नधान्याची फारशी फिकीर करू नका. वाटेत जे हाताला लागेल ते आपलंच आहे. गाड्यांतून मोजकं अन्नधान्य, आटा, रोट लादा. प्रत्येक कोसॅक घोडेस्वाराने प्रत्येकी दोन घोडे घ्या; आणि हे पाहा, मार्गात कोणीही अवास्तव मद्य प्राशन करू नका! मद्य प्राशन करून कोणी झिंगलेला आढळल्यास, कोणतीही  दयामाया न दाखवता मी त्याला कडक शासन करीन, त्याला गोळी घालून कुत्र्याप्रमाणे ठार मारीन. मग तो कोणीही, कितीही बडा असो! त्याचं प्रेत कोल्ह्याकुत्र्यांना, गिधाडांना खाण्यासाठी फेकून देण्यात येईल. त्याला मूठमातीही दिली जाणार नाही! आणि हे पाहा, कुणी जखमी झालात, तर जखमेवर माती मारा, जखमा मातीने बऱ्या होतात. कुणाला ताप आला तर व्होडकात बंदुकीची थोडीशी दारू घालून ते मिश्रण प्या, ताप हटतो, आपसूक बरं वाटतं. ठीक आहे पोरांनो, सर्व तयारी कडेकोट व शिस्तीत करा!''

सर्व झापुर्झी कोसॅक जमात तयारीला लागली.

गाड्यांची चाके दुरुस्त झाली. त्यांना नवीन कणे चढविण्यात आले. त्यांतून खाद्यपदार्थ व हत्यारे-पात्यारे लादली जाऊ लागली. घोड्यांच्या टापांचे आवाज सर्वत्र निनादू लागले. चाचणीसाठी डागलेल्या तोफा-बंदुकांचे आवाज कानठळ्या बसवू लागले. कोसॅकांच्या रणगर्जना निनादू लागल्या. एके दिवशी खवळलेला हा कोसॅक जनसागर गर्जत समोर पसरलेल्या गवताळ प्रदेशातून मार्ग काढीत पुढे जाऊ लागला. धर्मगुरूंच्या आशीर्वादाने तो पुलकित झाला होता.

''नमस्ते माते!'' त्यांनी सेचचा निरोप घेतला.

''नमस्ते माते, नमस्ते'' ते गरजले, ''आमच्या माघारी परमेश्वर तुझं रक्षण करील!''

लवकरच पोलंडचा नैऋत्य विभाग गर्भगळित झाला.

''झापुर्झियन आले! झापुर्झियन कोसॅकांची धाड आली!'' अशा बातम्या वायुवेगाने सर्वत्र पसरू लागल्या. जो तो सापडेल ती चीजवस्तू घेऊन पळ काढण्यात गुंतला होता. त्या काळात किल्ले, तटबंद्या यांची सोय फारच तुरळक होती. माणसे अन्नपाणी दिसेल तेथे स्थायिक होत; त्यामुळे वस्त्या तुरळक व असंघटित असत आणि मग अशी एखादी धाड आली म्हणजे माणसे सैरावैरा धावत सुटत. घरदार सोडून जाणे त्यांच्या अंगवळणी पडलेले असे. घरदार उभे करण्यात फारसे श्रम वा पैसा खर्च पडलेला नसल्याने त्यांना त्याचे काही वाटतही नसे. धाड अपेक्षित धरूनच त्यांनी बस्तान टाकलेले असे. सर्वस्व टाकून जीव वाचविण्यासाठी पळून जाणाऱ्या लोकांची रीघ हा तत्कालीन, एक सामान्य चमत्कार होता.

नैऋत्य पोलंडमध्ये आता अशीच धावपळ चालू होती. हाताला लागेल व नेता येईल अशी चीजवस्तू घेऊन माणसे जीव वाचविण्यासाठी सैरावैरा धावत होती. झापुर्झियन कोसॅकांना संघटित होऊन प्रतिकार करणे अशक्यप्राय आहे, याची संपूर्ण जाणीव त्यांना होती. उलट त्यामुळे महान् अनर्थ ओढवणेच शक्य होते.

कोसॅक घोडेस्वारांनी घोड्यावर फारसे सामान लादले नव्हते. त्यांच्या पाठोपाठ बैलगाड्यांचा तांडा व शेवटी पायदळ अशा थाटाने हे सर्व सैन्य रात्री प्रवास करी व दिवसा एखाद्या जंगलात वा खुल्या मैदानात आपला तळ टाकी. त्यांचे हेर आजूबाजूच्या मुलखात हिंडून अचूक बातम्या आणीत. प्रतिकाराची काही तयारी दिसल्यास तीही बातमी त्यांना मिळे.

कोसॅकांची ही टोळधाड मुलूख उजाड करीत व सापडेल त्याची कत्तल करीत चालली होती. या कत्तलीत बायका-मुलांचाही विचार केला जात नसे. कातडी सोलून काढणे, हातपाय तोडून टाकणे, या कोसॅक तंत्रातील सामान्य बाबी होत्या, पोलिश लोकांचा बदला घेतला जात होता. ठोशास ठोसा दिला जात होता. बदला घेण्यासाठी आसुसलेल्या कोसॅक जवानांना याबाबत संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले होते.

कोसॅकांचा हा जबरदस्त दणका पाहून एका मठाधिपतीने त्यांना समजाविण्यासाठी निरोप दिला, ''तुमचा हा अत्याचार तहनाम्याशी विसंगत आहे. कायदा व सुव्यवस्था यांना बाधक आहे. पोलंडच्या बादशहाला यामुळे राग येईल, तो बदला घेईल!''

''जा! जा! आम्ही पोलंडच्या बादशहाला भीक घालीत नाही! आमची ही जाळपोळ आमच्या चिलमी शिलगावण्यासाठी आहे.'' कोसॅक म्होरक्याने प्रतिनिरोप दिला.

हा निरोप ऐकताच सर्वांची पाचावर धारण बसली. धर्ममठांच्या आश्रयाने राहिलेले पोलिश स्त्री-पुरुष, ज्यू सर्वजण जीव घेऊन वाट फुटेल तिकडे सैरावैरा पळू लागले.

पोलंडच्या बादशहाचे सैनिक कोसॅकांचा हा लोंढा परतवून लावण्यासाठी जुळवाजुळव करून राहिले होते, पण कोसॅकांनी पहिल्या दणक्यातच त्यांना उध्वस्त केले. तरुण कोसॅकांना मिळालेल्या या संधीमुळे विलक्षण अवसान चढले. लूटमारीत त्यांना चढणारा उन्माद काही विलक्षण होता. महिन्याभराच्या धूमधडाक्यात त्यांचा चांगलाच कस लागला. त्यांचे कसलेल्या योद्ध्यांत रूपान्तर झाले.

बुल्बाचे दोनही मुलगे आता बेडर व कसलेले योद्धे म्हणून नावाजले जाऊ लागले. ''आता या पोरांची बरोबरी कोण करणार? सैनिकी तुकड्यांचं नेतृत्व करण्याची कुवत आता त्यांच्यात आली आहे!'' बुल्बा समाधानाने म्हणू लागला.

तलवारीचा खणखणाट व बंदुकीच्या गोळ्यांचा सणसणाट ओस्टाप व अँड्री यांना संगीतलहरींप्रमाणे आनंद

देऊ लागला. प्रतिपक्षाची ताकद अजमावणे, त्याच्या अचूक व्यंगाचा अंदाज घेऊन नेमका मारा करणे, या गोष्टी त्यांच्या हातचा मळ झाल्या होत्या. युद्धाचा उन्माद त्यांना आंधळे बनवू लागला. घोडे व त्यांवरील स्वार उलथून पडताना पाहून त्यांना मजा वाटू लागली. तलवारीचे वार करताना आपल्या अंगावर होणाऱ्या आघातांची शुद्धही त्यांना राहीनाशी झाली.

''माझी पोरं खरीखुरी कोसॅक योद्धे झाली.'' बुल्बा मोठ्या अभिमानाने म्हणू लागला.

●●●

## ५. डब्नोचा वेढा

सरळ सरळ डब्नो या पोलिश शहरावर चाल करून जाण्याचा निर्णय कोसॅक सैन्याने केला होता. या शहरात दडलेली अलोट संपत्ती खेचून बाहेर काढण्याचा त्यांचा निश्चय होता आणि हा निर्णय केल्यापासून अवघ्या दोन दिवसांत कोसॅक सेना डब्नोच्या वेशीवर येऊन धडकली.

शहरवासीयांनीही कोसॅकांना कडवा प्रतिकार करण्याचा निर्णय केलेला दिसत होता. शहराची तटबंदी सर्व बाजूंनी बंदिस्त केलेली दिसत होती. शहरातील सैनिक सामना देण्याच्या दृष्टीने सज्ज झाले होते. तटबंदीवर धडक देणाऱ्या कोसॅकांवर गोळ्यांचा भडिमार झाला. शहरवासी सामान्य नागरिकही स्तब्ध बसण्यास तयार नव्हते. त्यांनी दगड, विटा, तप्त डांबर, अवजड पिंपे, भांडी, यांचा वर्षाव कोसॅक सैनिकांवर केला. तटबंदीवर धडक मारण्यात अर्थ नाही, हे कोसॅक सैनिकांना कळून येण्यास वेळ लागला नाही. त्यांनी शहराला वेढा घालून व त्याची उपासमार करून शहरवासीयांना वठणीवर आणण्याचा निर्णय केला.

''मागे व्हा! मागे व्हा! आपणास माघार घ्यायची आहे!'' त्यांचा नेता ओरडून ओरडून सांगू लागला. ''पण लक्षात ठेवा, शहरातील प्रत्येक माणूस कुत्र्याप्रमाणे भुकेने तडफडून मेला पाहिजे. असं झालं नाही, तर आपण ख्रिश्चन नसून तार्तर आहोत, असं मानावं लागेल!''

मग कोसॅक सैनिकांनी माघार घेतली व सर्व शहराभोवती आपला वेढा आवळला. शहराच्या आसमंतातील प्रदेश जाळूनपोळून टाकण्याचा, उध्वस्त करून टाकण्याचा सपाटा त्यांनी चालू केला. शेतांमधील उभी पिके घोड्यांना चंदी म्हणून खाऊ घातली. हा सारा नाश बघताना शहरवासीयांची अंत:करणे पिळवटून गेली. शहर भीतीग्रस्त होऊन गेले.

इकडे झापुर्झियन कोसॅकांनी आपल्या बैलगाड्या शहराभोवती उभ्या करून त्यांच्या आश्रयाने आपला तळ ठोकला. ते चिलमी फुंकीत व करमणुकीसाठी अनेक खेळ खेळत; पण शहरावर त्यांची सक्त नजर असे. रात्री आगट्या पेटविल्या जात, त्यांच्या प्रकाशात आसमंतावर कडक नजर ठेविली जाई, तर त्यांच्या धगीवर रात्रीचा स्वयंपाक शिजविला जाई.

पण हळूहळू या निरुद्योगी जीवनाचा झापुर्झियन सैनिकांना कंटाळा येऊ लागला. चकमकीशिवाय जीवन व्यर्थ वाटू लागले. नेत्याने त्यांना मद्यप्राशनाची थोडी जास्त सवलत दिली, पण तीतही त्यांना आता रस वाटेना. अँड्री आणि ओस्टाप दोघेही कंटाळून गेले, चडफडू लागले. बुल्बा त्यांच्यावर भडकून म्हणाला, ''अरे माथी फिरली काय! खरे कोसॅक युद्धात जसे भयंकर असतात, तितकेच एरवी शांतही असतात! युद्धाच्या घिसाडघाईप्रमाणे वेढ्याच्या निरुद्योगीपणातही त्यांनी संयम राखण्यास शिकलं पाहिजे!''

मध्यंतरीच्या काळात आणखी चार एक हजार कोसॅक त्यांना येऊन मिळाले. आपल्या जातभाईंनी पोलंडशी मुकाबला चालू केल्याची वार्ता त्यांना कोठूनतरी समजली आणि मग त्यांच्या मदतीसाठी ते धावून आले. आलेल्या सैनिकांकडून ओस्टाप व अँड्री यांना आईची वार्ता समजली, तिचे शुभाशीर्वादही त्यांना मिळाले.

रात्रीची वेळ होती. कोसॅक सैनिक आपापली जेवणे आटोपून विश्रांती घेण्याच्या तयारीत होते. जुलै महिन्यातील ती एक सुंदर रात्र होती. अशा या नितांत रमणीय रात्री मुकाट्याने झोप काढणे अँड्रीला पसंत नव्हते.

तो लष्करी तळावरून इतस्तत: भटकत होता. जिकडेतिकडे माणसे, गाड्या घोडी पसरलेली दिसत होती. आकाशात लाखो चांदण्या चमचम करीत होत्या. त्यांच्या अंधुक प्रकाशात रवंथ करीत बसलेले बैल कापसाचे पुंजके पडल्याप्रमाणे दिसत होते.

सोडलेल्या गाड्यांच्या रांगांमधून वाट काढीत अँड्री चालला होता. आता बरीच रात्र झाली होती. लक्ष ठेवण्यास सोपे जावे म्हणून पेटविलेल्या आगट्या कोळपू लागल्या होत्या. आंबील पिऊन व व्होडका ठासून सुस्त व सुंद झालेले पहारेवाले बसल्या जागी डुलक्या घेऊ लागले होते. ''छाऽ! काय निष्काळजीपणा आहे! जवळपास एखादा जबर शत्रू नाही म्हणून ठीक आहे!'' अँड्री स्वत:शीच पुटपुटला. शेवटी तो एका गाडीत चढला आणि आकाशाकडे पाहात हातपाय लांब करून उताणा पडून राहिला. हवा थंड होती. आकाश निरभ्र होते. हवेतील विलक्षण मार्दव व सुंदर तारकासमूह यांमुळे अँड्रीची तंद्री लागली.

अधूनमधून अँड्रीला डुलकी लागे. मग आळसटपणाने तो हळूच डोळे उघडी; एकाएकी आपल्या डोळ्यापुढे एखादा मानवी चेहरा तरळत असावा, असा त्याला भास झाला. त्याने सताड डोळे उघडले व तो निरखून पाहू लागला आणि मग त्याला कळून चुकले, की आपणाला भास होत नसून खरोखरीच कोणीतरी व्यक्ती आपल्याकडे निरखून पाहात उभी आहे. ''कोण आहे? माणूस की सैतान? चल निघून जा इथून. नाहीतर गोळी घालून ठार करीन!'' तो दरडावणीच्या स्वरात म्हणाला. पण त्या व्यक्तीने उत्तर दिले नाही, फक्त आपल्या ओठांवर बोट ठेवून व-''श्शूऽ'' करून त्याला स्तब्ध बसण्यास सुचविले. अँड्रीने सावधानपणानं त्या व्यक्तीचे निरीक्षण करण्यास सुरुवात केली व मग त्याच्या लक्षात आले, की या व्यक्तीस आपण कोठेतरी पाहिले असावे. ''तू कोण आहेस? मला वाटतं मी तुला कुठे तरी पाहिलं असावं!'' तो हळूच म्हणाला.

''होय! दोन वर्षांपूर्वी कीव्हमध्ये!''

''दोन वर्षांपूर्वी कीव्हमध्ये?'' अँड्री अनेक घटनांचे स्मरण करू लागला आणि मग एकदम म्हणाला, ''हां ऽ हां ऽऽ तू त्या पोलिश सुंदरीची दाई की काय?''

''श्शूऽ! श्शूऽऽ!!'' ती तार्तर बाई थरथर कापत उद्गारली. अँड्रीच्या बडबडीने कोणी जागा झाल्यास भयंकर प्रसंग ओढवेल या भीतीने ती अर्धमेली झाली होती.

अँड्रीच्या डोळ्यापुढून त्या जुन्या घटना नव्याने दिसू लागल्या. विचारांची, विकारांची एकच गर्दी त्याच्या अंत:करणात उसळली. तो श्वास रोखून अत्यंत हलक्या आवाजात म्हणाला, ''तू इथे का आलीस? तुझी मालकीण कुठे आहे? ती जिवंत आहे काय?''

''होय. ती इथेच या शहरात आहे!''

''या शहरात? का? कशासाठी?'' अँड्री भानरहित होऊन ओरडला.

''तिचा बाप या डब्नो शहराचा अधिपती आहे! आणि म्हणूनच ती या शहरात राहात आहे.''

''तिचं लग्न झालं आहे काय? तिचं कसं काय चाललं आहे?''

''गेल्या दोन दिवसात तिच्या पोटात अन्नाचा कणही गेलेला नाही?''

''तो का?''

''कोणाच नगरवासीयाला भाकरीचा तुकडाही गेल्या काही दिवसात मिळालेला नाही. आता त्यांना फक्त माती खाणं शक्य आहे!''

अँड्री स्तंभित झाला.

''माझ्या मालकिणीने तटावरून काल तुम्हाला कोसॅक सैनिकांत पाहिलं व नंतर ती मला म्हणाली, 'त्या सरदाराकडे जा आणि त्याला म्हणावं मी त्याला बोलावलं आहे. त्याला जर इथं येणं शक्य नसेल, तर त्याच्या हातापाया पडून निदान काही भाकऱ्या तरी मागून आण.' म्हणून मी धोका पत्करून इथंपर्यंत आले आहे.''

अँड्रीच्या मनात एकच काहूर उठले. त्याने विचारले, ''पण तू इथंपर्यंत आलीस तरी कशी?''

''भुयारी मार्गाने!''

''इथंपर्यंत येणारा एखादा भुयारी मार्ग आहे?''

''होय!''

''कुठं आहे?''

''तू आम्हाला दगा देशील, म्हणून सांगता येत नाही.''

''पवित्र क्रूसाची शपथ घेऊन मी वचन देतो, की तसं

काही होणार नाही!''

''समोर दिसणाऱ्या दरीतून वाहाणाऱ्या ओढ्यापलीकडे जे बोरूबन आहे, तिथून हा मार्ग आहे.''

''पण हा मार्ग सरळ शहरात जातो का?''

''नाही. तो शहरातील एका मठात जातो.''

''मग चल आपण जाऊया!''

''प्रथम भाकऱ्यांची तजवीज केली पाहिजे.''

''हाऽत् एवढंच ना?'' एवढे बोलून अँड्रीने गव्हाच्या रोटांचे एक पोते गाडीतून खसकन् ओढून बाहेर काढले व तो त्या तार्तर बाईबरोबर चालू लागला. जाताना त्याची छाती धडधडत होती. पाय लटपटत होते. त्याची उत्सुकता कमालीची जागृत झाली होती. श्रमशांत व मद्यपी कोसॅक जवानांपैकी कोणी जागे होण्याची मुळीच शक्यता नव्हती. खाण्याने व मद्यपानाने त्यांना आलेली सुस्ती विलक्षण होती. त्यांची झोप किती गाढ आहे, याची कल्पना त्यांच्या घोरण्यावरून सहज येण्याजोगी होती.

मध्येच कोणीतरी जागे होई, डोळे फाडून बघे, बोबड्या भाषेत ''क् क् कोऽण'' अशी विचारणा करी व फिरून मरगळून झोपी जाई. ती तार्तर बाई मात्र भीतीने कापत होती. श्वास रोखून जपून चालत होती.

''चल चल, भिऊ नको. सर्वजण गाढ झोपी गेले आहेत.'' अँड्री तिला म्हणाला.

झोपलेल्या झापुर्झियन सैनिकांमधून मार्ग काढीत ते उभयता चालले होते. ''अँड्री!'' झोपलेल्या बुल्बाजवळून जात असता बुल्बाने त्याला हटकले. अँड्रीच्या काळजाचे पाणी पाणी झाले. तो थरथर कापू लागला व हळूवार, कंपित आवाजात म्हणाला, ''काऽऽय?''

''तुझ्याबरोबर कोणी बाई दिसते आहे. तुझी चामडी सोलून काढली पाहिजे!'' बुल्बा गुरगुरला, कोपर टेकून अर्धवट उठला. डोळे फाडफाडून त्या दोघांकडे पाहू लागला.

अँड्री दगडी पुतळ्याप्रमाणे स्तब्ध उभा होता. वर मान करून बापाकडे पाहाण्याची त्यास छाती होत नव्हती. पण त्याचे संकट थोडक्यातच दूर झाले. आळसाटपणाने बुल्बा फिरून जमिनीवर अस्ताव्यस्त पसरला व गर्रअऽऽ फस्ऽ करून घोरू लागला.

हां हां म्हणता दोघांनी दरी पार केली, ओढा ओलांडला व बोरूबनात लपलेल्या भुयारीमार्गात प्रवेश केला. ती तार्तर बाई पुढे झाली. भुयारी मार्ग अत्यंत अरुंद व अंधारमय होता. त्यातून जाताना बरेच वाकूनही जावे लागत होते. अँड्री त्या तार्तर बाईच्या मागून चाचपडत चाचपडत जात होता. आपण ही गोष्ट करीत असताना काही दगाफटका तर होणार नाही ना, अशी पुसट शंकाही त्याच्या मनात डोकावत नव्हती. एका विशिष्ट औत्सुक्याने तो भारावला होता आणि त्या नादातच तो भाकऱ्यांचा बोजा घेऊन खुरडत पुढे पुढे जात होता.

दुरून कोठून तरी अंधार फाडीत प्रकाशशलाका आली. भुयारी मार्ग संपत आला असावा याचा अंदाज अँड्रीला आला.

''आता लवकरच आपल्याला प्रकाशात जायला मिळेल!'' ती तार्तर बाई म्हणाली, ''आपण आता त्या मठाच्या अगदी जवळ आलो आहोत!'' हळूहळू ती उभयता त्या प्रकाशाच्या जवळ जवळ येऊ लागली होती व त्यामुळे भुयारात अंधुक अंधुक दिसू लागले होते. शेवटी ती एका कॅथॉलिक धर्ममठात येऊन दाखल झाली.

मोकळ्या हवेत आल्याने अँड्रीला एकदम ताजेतवाने वाटले. त्याच्या निरोगी व सुंदर चेहऱ्यावर आकर्षक टवटवी आली. अँड्रीचा दिमाख, तरतरी व सौंदर्य पाहून ती तार्तर दाई चकित होऊन गेली. अँड्रीने पाठीवरील ओझे उतरवून शरीर ताठ केले, आळोखेपिळोखे दिले.

''परमेश्वरी कृपा. आपण ठरल्या ठिकाणी सुखरूप येऊन तर पोचलो!'' ती तार्तर दाई म्हणाली. एवढ्यात कोणीतरी जिन्यावरून उतरत असल्याप्रमाणे पदरव ऐकू आला. थोड्याच वेळात एक कॅथॉलिक धर्मगुरू जिना उतरून त्यांच्या समोर येऊन उभा राहिला. त्याच्या हातात एक भली मोठी मेणबत्ती होती. तिच्या प्रकाशात त्याचे व्यक्तिमत्व स्पष्ट उठून दिसत होते. आपल्या कोसॅक जातभाईंचा द्वेष करणारे, त्यांच्या हालास, छळास कारणीभूत होणारे कॅथॉलिक धर्मगुरू अँड्रीच्या तिरस्काराचे विषय होते. त्याच कॅथॉलिक धर्मगुरूंचे दर्शन होताच अँड्रीचे रक्त तापले. पण तो ज्या पोलिश तरुणीच्या दर्शनासाठी आसुसलेला होता, तिच्या घराचा मार्ग या मठातून जात असल्याने त्याने आपला राग आवरला;

जातभाईंच्या उपमर्दाचा सूड घेण्याची इच्छा दाबून टाकली.

आपल्या समोर एक झापुर्झियन कोसॅक योद्धा उभा आहे हे पाहाताच तो धर्मगुरूही चांगलाच हादरला व दचकून मागे सरकला. पण त्या तार्तर बाईने झटकन् पुढे होऊन हलक्या आवाजात त्याला काही सांगितले व मग त्याने आपली मन:स्थिती सावरून त्या उभयतांना मेणबत्तीच्या प्रकाशात मार्गदर्शन करीत मठाच्या एका विशिष्ट भागाकडे नेले.

समोरच एक कॅथॉलिक प्रार्थनामंदिर दिसत होते. त्याच्या उंच उंच कमानी पहाटेच्या अंधुक प्रकाशात उदासवाण्या दिसत होत्या. गुडघे टेकून प्रार्थना करणारे अनेक धर्मगुरू दिसत होते. शहराचा बचाव व्हावा, म्हणून त्यांची प्रार्थना चालली होती. अँड्री हा सर्व देखावा स्तिमित होऊन पाहात होता. एवढ्यात त्याची अस्तनी हळूच ओढली गेली. ''चला, आपल्याला पुढे जायचं आहे!'' ती तार्तर दाई म्हणाली.

आपणाकडे कोणाचे लक्ष जाणार नाही, अशा बेताने ती उभयता लपतछपत चालली होती. प्रार्थनामंदिराची इमारत ओलांडून गेल्यावर ती उभयता एका चौकात येऊन पोचली. एव्हाना सूर्योदयाची चिन्हे पूर्वक्षितिजावर दिसू लागली होती. पण चौकात अद्यापि शुकशुकाट होता. आजूबाजूची दुकाने ओस पडलेली दिसत होती. कोसॅक वेढ्यामुळे भ्यालेल्या व्यापाऱ्यांनी आपली मालमत्ता अन्यत्र हलविली असावी. गावाची रचना, गाव पोलिश असल्याची स्पष्ट कल्पना देत होती.

चौक अगदी शांत, नीरव होता. एकाएकी अँड्रीच्या कानावर कोणीतरी विव्हळत असल्याचा आवाज आला. त्याने चमकून आजूबाजूला पाहिले. रस्त्याच्या बाजूला दोन-तीन माणसे धुळीत विव्हळत पडली होती. तो तिकडे जाण्यासाठी निघाला, पण कशालातरी एकदम अडखळला. त्याने खाली पाहिले. ते एका ज्यू स्त्रीचे प्रेत होते. बाई वयाने लहान असावी, पण तिच्या खंगलेल्या शरीरामुळे तिचे वय वा सौंदर्य कळून येण्यास मार्ग नव्हता. तिने कपाळाभोवती एक रंगीबेरंगी हातरूमाल गुंडाळलेला होता. तिच्या शेजारीच धुळीत तिचे तान्हे मूल पडलेले दिसत होते. त्या मुलाच्या तोंडातून रडण्याचा स्वर बाहेर येणे शक्य नव्हते. आईची घटका भरली होती. मुलाची भरत आली होती. त्याची अंतिम वळवळ चालू होती.

●●●

## ६. अँड्री जमातीला मुकला

उपासमारीचे व मृत्यूचे हे थैमान पाहून अँड्री थक्क झाला. एवढ्यात त्याच्यावर कोणीतरी झडप घातली. झडप घालणारी व्यक्ती ओरडली, ''भाकरी! भाकरी!!'' पण त्या व्यक्तीला अँड्रीने असा झोला दिला की तो गरीब बिचारा माणूस कोलांट्या खातच जमिनीवर आदळला. पण मग अँड्रीला त्याची दया आली. त्याने त्याच्या अंगावर एक रोट फेकला. तो इसम त्या रोटावर असा तुटून पडला, की सांगता सोय नाही. वखवखलेल्या कुत्र्याप्रमाणे त्याने तो रोट कचाकचा चावून खाण्यास सुरुवात केली. अँड्रीला दिसून आले, की भुकेने कासावीस झालेले लोक काही तरी खावयास मिळेल म्हणून, गल्लोगल्ली लांडग्याप्रमाणे वसावसा करीत हिंडत होते. उपासमारीचे हे विलक्षण दृश्य पाहून अँड्री त्या तार्तर बाईला म्हणाला, ''या लोकांना खरंच काही खायला मिळत नाही का? ज्या वेळी अशी अन्नान्न दशा येते, त्यावेळी निषिद्ध मानले गेलेले पशूपक्षी मारून खायला मुळीच हरकत नाही!''

''ते सर्व करून झाले आहे! घोडे, कुत्री, मांजरं, फार काय उंदीरसुद्धा मारून खाण्यात आले आहेत!'' ती तार्तर बाई उद्गारली.

''असं असताना हे शहर लढवण्याची भाषा तुम्ही कशाच्या जोरावर चालवली आहे?''

''कालच बातम्यांची ने-आण करणाऱ्या ससाण्याने संदेश आणला आहे. ताज्या दमाचं सैन्य व पुरवठा शहराकडे येण्याच्या मार्गावर असून तोपर्यंत दम काढण्याचा

हुकूम देण्यात आला आहे!''

एवढ्यात अँड्रीचे लक्ष समोरच असलेल्या एका भव्य प्रासादाकडे गेले. त्याची इटालियन पद्धतीची बांधणी उठून दिसत होती. ''ओऽहोऽ, आपण आलोच आपल्या घरापाशी!'' ती दाई म्हणाली. प्रासादाच्या दारात बसलेले पहारेवाले अशा अवस्थेत होते, की ते बिचारे जागे आहेत की झोपले आहेत, हे सांगणे कठीण होते. ते नावालाच पहारेवाले होते. येणाऱ्या-जाणाऱ्यांकडे त्यांचे काही लक्ष असेल असे वाटत नव्हते. ती तार्तर बाई अँड्रीला घेऊन त्यांच्या पुढून सरळ सरळ आत गेली, पण त्यांनी या गोष्टीची मुळीच दखल घेतली नाही.

ती उभयतांही जिना चढून वर गेली. वरच्या सज्जात नखशिखान्त शस्त्रास्त्रे धारण केलेला एक भव्य योद्धा उभा होता. हातातील प्रार्थना-पुस्तकात पाहून तो काहीतरी पुटपुटत होता. त्या उभयतांची हालचाल ऐकून त्याने आपले मस्तक वर उचलले. त्याचे डोळे भकास व निस्तेज दिसत होते. ती तार्तर बाई त्याच्याजवळ जाऊन काही पुटपुटली आणि फिरून तो माणूस प्रार्थनापुस्तकात डोके घालून बसला. तेथून ती एका प्रशस्त खोलीत गेली. पोलिश सरदाराच्या दिमाखाला साजेल असा नोकर-चाकरांचा भरणा तेथे होता. पण हे सर्वच चाकर पाठीचे पोक काढून भिंतीला टेकून बसले होते. उपासमारीची व भीतीची एकच काळी छाया त्यांच्या तोंडावर पसरली होती.

त्या दाईने अँड्रीला एके ठिकाणी उभे केले व समोर दिसणाऱ्या खोलीत प्रवेश करण्याबद्दल त्याला खुणावले. त्या खोलीच्या दारातून मेणबत्तीचा मंद प्रकाश बाहेर येत होता. अँड्रीने खोलीत प्रवेश केला आणि संगमरवरी पुतळीप्रमाणे स्तब्ध उभी असलेली ती पोलिश तरुणी त्याच्या नजरेस पडली. कीव्हमधील एका प्रासादात पाहिलेल्या त्या रमणीची आजची ही अवस्था मोठी अनुकंपनीय होती. तिच्या डोळ्यात अश्रू तरळत होते. एकाएकी समोर येऊन उभ्या राहिलेल्या कोसॅक युवकाला पाहून ती भयचकित झाली. अँड्री तारुण्याने व सौंदर्याने मुसमुसत होता. त्याची तीक्ष्ण नजर विलक्षण तेजाने तळपत होती. त्याच्या ओठावर फुटलेल्या काळ्याभोर मिशांची रेघ त्याच्या लालबुंद गोल चेहऱ्यावर मोठी उठून दिसत होती.

''उमद्या सरदारा, तुझे आभार मानायला मजपाशी शब्द नाहीत! माझ्यासारखी दुबळी तरुणी तुला काय पारितोषिक देणार? तुझ्या या कर्तृत्वाबद्दल परमेश्वरानेच तुला पारितोषिक दिलं पाहिजे!'' एवढे बोलून तिने आपली नजर जमिनीकडे वळविली. अँड्रीला आपले अंत:करण मोकळे करण्याचा मोह अनावर झाला, पण त्याच्या तोंडातून शब्द बाहेर पडेना. सर्व आयुष्य लष्करी पेशात व धागडधिंग्यात गेल्यामुळे त्याला उत्तरासाठी योग्य शब्द सुचेनात. त्याने मनातल्या मनात आपल्या कोसॅक स्वभावाला दूषण दिले.

एवढ्यात त्या तार्तर दाईने आत प्रवेश केला. अँड्रीने आणलेल्या रोटाचे तुकडे करून तिने ते एका सोनेरी तबकातून आणले होते. तिच्या मालकिणीने तबकाकडे, तिच्याकडे व अँड्रीकडे एकेकदा आळीपाळीने पाहिले. अँड्रीची नजर भावपूर्ण होती. त्याच्या तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हता, पण नजरेतील भावना अबोल नव्हती. ती तरुणी दाईला उद्देशून एकदम म्हणाली, ''तू आईला काही दिलीस काय?''

''नाही, त्या अद्यापि झोपल्या आहेत.''

''बाबांना?''

''होय! सरदारसाहेबांचे आभार मानण्यासाठी, ते स्वत:च इकडे येत आहेत!''

नंतर त्या तरुणीने काही तुकडे उचलले व हावरेपणाने आपल्या मोत्यासारख्या दातांनी कचाकचा चावून खाण्यास सुरुवात केली. अँड्री झटकन् पुढे येऊन म्हणाला, ''हांऽ हांऽ जरा बेताने. दीर्घकाळ उपासमार झालेल्या माणसाला असं एकदम खाणं मानवणार नाही! अन्न यामुळे विषच ठरेल! अरेरे, काय ही तुझी दशा? तू आज्ञा कर, तुझ्या आज्ञेसाठी मी प्राणार्पणही करायला तयार आहे. पवित्र क्रूसाची शपथ घेऊन मी तुला आश्वासन देतो, की यात अंतर पडणार नाही!'' अँड्री मूर्खासारखे बरळू लागला. अँड्रीचे भाषण ती तरुणी आश्चर्यचकित होऊन ऐकत होती. अँड्रीच्या जातभाईंनी तिच्या शहराला वेढा घातला होता. शहरातील प्रत्येक माणसाचा जीव घेण्यासाठी झापुर्झियन कोसॅक आसुसले होते आणि त्यांच्यातीलच एक माणूस एका बाईपुढे उभा राहून आपल्याच जातभाईंवर

उलटण्याच्या गोष्टी करीत होता. ती काहीच बोलली नाही, पण रुमालाने तोंड झाकून हुंदके मात्र देऊ लागली.

''तुला कुणी दु:ख दिलं काय?'' अँड्री फिरून भकू लागला, ''तुझ्या एका शब्दासाठी मी काहीही करायला तयार आहे. माझे जातभाई काहीही म्हणोत. माझं जीवित मी तुझ्या चरणी अर्पण केलं आहे.'' शेवटी मोठ्या कष्टाने ती तरुणी म्हणाली, ''आता आम्हाला कोणत्याच सुखाची आशा राहिलेली नाही!''

''नाही! नाही! तसं होणं शक्य नाही! मी तुला मरू देणार नाही. माझं सारं शौर्य, सामर्थ्य तुजवरील आपत्ती दूर करण्यासाठी उपयोगी पडणार नसेल तर आपण एकदमच मरू!''

''आता एका मृत्यूशिवाय आम्हांस कोणीच मदत करू शकणार नाही!'' ती तरुणी कंपित स्वरात बोलू लागली, ''तुम्ही आपली अशी फसवणूक करून घेण्यात अर्थ नाही. तुमचं कर्तव्य, तुमच्या श्रद्धा, तुमचा पिता आणि तुमचे सर्व सहकारी, या सर्वांना डावलून तुम्ही या शत्रूकन्येला जवळ कराल, असं वाटत नाही!''

अँड्री ताठ उभा राहून म्हणाला, ''कुठला बाप आणि कुठले सहकारी! मी काही जाणत नाही! मला कुणाचीही व कशाचीही भीती नाही! कोण म्हणतो, युक्रेन माझी जन्मभूमी म्हणून? तूच माझा देश! तूच माझा धर्म!! आणि या देशासाठी, धर्मासाठी मी कशाचाही, कुणाचाही नाश करण्यास तयार आहे!'' ती तरुणी एखाद्या दगडी पुतळ्याप्रमाणे स्तब्ध उभी राहून साश्रूनयनांनी अँड्रीकडे पाहू लागली.

सडकेत काही गलबला ऐकू येऊ लागला. तुताऱ्यांचे व पडघमांचे आवाज ऐकू येऊ लागले. पण अँड्रीचे या कशाकडेच लक्ष नव्हते. आपल्या प्रेयसीकडे एकाग्र चित्ताने पाहाण्यात तो गुंग झाला होता. एवढ्यात ती तार्तर दाई धावतच आत आली व ओरडली, ''वाचलो! आम्ही वाचलो. आपली सैनिकी कुमक आली आहे! त्यांनी अन्नधान्य आणलं आहे. कित्येक कोसॅक कैदीही आणले आहेत!'' पण या उभयतांचे तिच्या बडबडण्याकडे मुळीच लक्ष नव्हते.

अँड्री कोसॅक जमातीला मुकला होता. पोलिश रमणीच्या सौंदर्यपाशात अडकलेला अँड्री आपल्या पित्याला, धर्ममंदिराला, झापुर्झियन कोसॅक जमातीला संपूर्ण मुकला होता. युक्रेनच्या रक्षणासाठी प्राणार्पण करावयास सज्ज झालेल्या कोसॅक जमातीपासून तो विभक्त झाला होता. ही वार्ता कळताच म्हातारा बुल्बा तडातड केस उपटून घेईल, तोंडात माती घालून घेईल, कुलांगार कार्टा जन्माला आला म्हणून मस्तक बडवून घेईल अगर तोंडावर हात घेईल, पण अँड्रीला आता त्याची पर्वा नव्हती, म्हणूनच भीतीही नव्हती.

झापुर्झियन तळावर एकच गडबड गोंधळ माजला होता. आरडाओरडा चालू होता. शहरात सैनिकी कुमक जाऊन पोचली कशी, हा एकच प्रश्न सर्वत्र चर्चिला जात होता. हेच कोडे सर्वांना पडले होते. नंतर असे कळून आले, की शहराच्या वेशीवर नजर ठेवण्यासाठी तळ टाकून पडलेल्या कोसॅक तुकडीने या कामी कुचराई केली होती. तुकडीतील सर्वांनी चिक्कार आंबील व व्होडका ठासली होती आणि त्यामुळे रात्री ते सुंद होऊन पडले होते. शहराला कुमक घेऊन आलेल्या सैनिकांनी याचा पुरेपूर फायदा घेतला होता. त्या कोसॅक तुकडीतील निम्मे सैनिक जागच्या जागी ठार झाले होते व बाकीचे कैद करून नेण्यात आले होते, हे काय होत आहे हे कळण्याइतपत फुरसत त्यांना मिळाली नव्हती. झालेल्या गडबडीमुळे आजूबाजूचे सैनिक आपल्या तंद्रीतून जागे झाले, पण त्यांना स्वत:ला सावरण्यासही संधी मिळाली नाही. त्यांची हत्यारे-पात्यारेच काय, पण विजारीही छिनावून घेण्यात आल्या होत्या. आणि मग सर्वत्र एकच गडबड गोंधळ माजला.

नेत्याने सर्व सैनिकांना एकत्रित केले. तो त्यांना उद्देशून म्हणाला, ''बंधूंनो, मद्याचा प्रताप कसा असतो ते पाहिलंत ना? शत्रू आपल्या तोंडावर थुंकला आहे! तुम्ही कडवे ख्रिश्चन योद्धे असून तुमच्या तोंडाला काळं फासलं गेलं आहे. आपल्या ढुंगणाच्या विजारीही त्यांनी काढून नेल्या. आपली आणखी निराळी शोभा ती काय व्हायची राहिली?'' सर्व कोसॅक सैनिक खाली माना घालून हे भाषण ऐकत उभे होते. एवढ्यात कुकुबेंको पुढे आला व म्हणाला, ''नेत्याचं भाषण झाल्यानंतर मी बोलणं सयुक्तिक नाही, पण प्रसंगच असा आहे, की मी हा प्रघात डावलून बोलणार

आहे, बोलणं भाग आहे. कोसॅक जवान चाल करीत असताना मद्य प्राशन करून झिंगले असते, तर त्यांना ठार मारणंच सयुक्तिक ठरलं असतं, पण गेले काही दिवस आळसात गेल्याने त्यांना फाजील मद्यप्राशनाची बुध्दी झाली, तर ती क्षम्य मानली पाहिजे. आतापर्यंत आम्ही शत्रूला हैराण केलं आहे. यापुढे नव्या निश्चयाने त्यांना असा मार देऊया, की त्यांना जिवंत सुटणं अशक्य झालं पाहिजे!''

''मला वाटतं कुकुबेंको रास्त तेच बोलत आहे.'' बुल्बा म्हणाला.

''खरं आहे! खरं आहे! झालं गेलं होऊन गेलं. आता आपण योग्य तो धडा घेऊन फिरून नव्या जोमाने शत्रूवर आघात केला पाहिजे, झाल्या गोष्टीचा बदला घेतलाच पाहिजे!'' नेताजी म्हणाला. यानंतर कोसॅक सेना फिरून जागृत झाली. नव्या उल्हासाने हालचालीस लागली.

''ऐका बंधूंनो!'' नेता फिरून बोलू लागला, ''ही तटबंदी चढून जाण्याचा अगर ती खणून काढण्याचा, कोणताच प्रयत्न करण्यात अर्थ नाही. शत्रूला आलेली कुमक फार मोठी असण्याची शक्यता नाही, अगर त्यांनी आणलेली साधनसामग्रीही फार दिवस पुरेल इतकी असणं शक्य नाही. अशा स्थितीत शत्रूला वठणीवर आणणं अवघड नाही. यांना तंग करूनच मारलं पाहिजे. बुल्बा, तुझी स्वत:ची व आणखी काही तुकड्या मदतीस घेऊन दबा धरून राहा! काही तुकड्या शहराची डावी व उजवी फळी रोखून धरतील. आमच्यातील काही फटकळ माणसं शत्रूला हिणवून, चिडवून त्याला शहराबाहेर खेचण्याचा प्रयत्न करतील. पोलिश तसे बिनडोकच असतात. त्यांना शिवीगाळी केली, हिणविलं तर ते नक्कीच सामना देण्यासाठी, आसरा सोडून बाहेर येतील आणि मग आयतेच आपल्या तावडीत सापडतील! आता मात्र संपूर्ण दक्षता घ्या! मद्यप्राशन करू नका! जर प्रमाणाबाहेर मद्य प्राशन करून कोणी झिंगलेला आढळला, तर त्याची शंभर वर्षं भरली म्हणून समजा!''

नेत्याला सर्वांनी नतमस्तक होऊन अभिवादन केले.आतापर्यंत बोडक्याने उभ्या असलेल्या कोसॅकांनी आता टोप्या घातल्या आणि मग तयारीला सुरुवात केली. तलवारी तपासून घेतल्या. बंदुकी ठासण्यासाठी लागणारी दारू शिंगटांत भरून घेतली. घोड्यांची निवड केली व तटबंदीभोवती बैलगाड्यांचा चक्रव्यूह तयार करून त्याच्या आडोशाने आपला तळ दिला.

बुल्बा आपल्या तुकडीकडे चालला होता, पण अँड्रीचा विचार त्याच्या डोक्यात घोळत होता. 'तो शत्रूच्या हाती लागला असावा काय? पण अँड्री सुखासुखी शत्रूच्या हाती लागणं शक्य नाही! तो मारला गेला म्हणावं, तर मृत सैनिकांत त्याचं प्रेत आढळलं नव्हतं.' बुल्बा विचारात इतका गढून गेला होता, की तो आपल्या तळावर केव्हा आला हे त्याचे त्यालाच समजले नाही. आपणास कोणी तरी हाका मारीत आहे, हे लक्षात आल्याने तो भानावर आला व इकडे तिकडे पाहात ओरडला, ''कोण मला हाका मारत आहे?'' आणि मग यांकेल नावाचा ज्यू व्यापारी त्याच्या पुढे येऊन उभा राहिला.

''सरदारसाहेब, सरदारसाहेब!'' तो घाईघाईने पण घाबरत चाचरत म्हणाला, ''मी आताच शहरामधून आलो महाराज!'' बुल्बा त्याच्याकडे टक लावून पाहू लागला. हा व्यापारी शहरात गेला कसा? व तेथून बाहेर आला कसा? हे कोडेच त्याला उलगडेना. ''तू शहरात जाऊन आलास?'' त्याने आश्चर्याने विचारले.

''होय महाराज!''

''तो कसा?''

''पहाटे पहाटे गडबड झाली. कोसॅक लोकांचा गोळीबार झाला. काय चाललं आहे ते पाहावं, म्हणून मी पुढं गेलो. तो पोलिश सैनिक प्रमुख गॅलयोविक् माझ्या नजरेस पडला. तो शहर रक्षणासाठी कुमक घेऊन आला होता. हा अधिकारी माझं देणं लागत असल्याने मी त्याची पाठ धरून शहरात गेलो.''

''खोटं! साफ खोटं! सावकार हाती लागला असताना त्याला ठार मारण्याचं सोडून कोणता लष्करी अधिकारी त्याला आपल्या बरोबर घेऊन जाईल?''

''माझ्यावर तीच पाळी होती महाराज, पण मी त्याला सर्व कर्ज माफ केल्याचं सांगितलं एवढंच नव्हे, तर त्याला आणखीही काही पैसे दिले व त्याच्या सैन्यांतील इतर लोकांनी माझं देणं द्यावं, यासाठी मदत करण्याची विनंती केली. मग त्याने मला आपल्याबरोबर शहरात नेलं.''

● ● ●

## ७. अँड्रीचा तपास लागला

''तुला शहरात आमची काही माणसं दृष्टीस पडली काय?'' बुल्बाने अधीरतेने विचारले.

''मला इतर फारसे कोणी दिसले नाहीत, पण आपला धाकटा मुलगा अँड्री मात्र दृष्टीस पडला होता.''

''काय? माझा मुलगा? कसा? कुठे? त्याला जिवंत गाडला? त्याचे हालहाल केले? त्याचा अपमान केला?''

''छाऽ छाऽ महाराज! अँड्रीला असं कोण करणार? तो आता बडा सरदार बनला आहे! त्याच्या कपड्यावरील सर्व लष्करी मानचिन्हं सोन्याची आहेत! तो एका प्रासादात राहात आहे. तेथील बगीच्यात सुवासिक फुलं उमलली आहेत. तिथं पक्ष्याचं कूजन चालू आहे.'' यांकेलची बडबड ऐकून बुल्बा थक्क झाला, बावचळला. ''पण परकीय लष्करी अधिकाऱ्याचा गणवेश त्याने आपल्या अंगावर घातलाच कसा?'' त्याने विचारले.

''कसा म्हणजे? तो आता पोलिश सरदार बनण्याच्या मार्गावर आहे! तो आपणहून त्यांना जाऊन मिळाला आहे.''

''अँड्री त्यांना जाऊन मिळाला?''

''होय महाराज!''

''खोटारडा! हरामखोर! भुक्कड! तू खोटं सांगतोस!''

''आपणापुढे खोटं सांगायला मी काय मूर्ख आहे? मी खोटा ठरलो तर तत्काळ माझं डोकं मारलं जाईल, हे काय मला माहीत नाही?''

''याचा अर्थ त्याने आपली मातृभूमी विक्रीला काढली!''

''त्याने काय विक्रीला काढलं आहे, हे मला माहीत नाही. तो विरुद्ध शत्रूपक्षास मिळाला आहे, एवढंच मला माहीत आहे.''

''खोटं, साफ खोटं! ख्रिश्चन विश्वात असं घडणं शक्य नाही! तू खोटं बोलत आहेस! तू डुक्कर आहेस.''

''मी जर खोटं बोलत असेन, तर माझ्या घरादाराचा सत्यानाश होईल! माझ्या आईवडिलांच्या थडग्यावर लोक थुंकतील! पण सरदारसाहेब, आपली इच्छाच असेल, तर अँड्री शत्रूपक्षास का मिळाला, हेही मी आपल्याला सांगू शकेन!

''सांग, सांग!''

''शहराधिपतीची मुलगी सुंदर आहे.'' मग यांकेलने त्या मुलीच्या सौंदर्याची कल्पना येण्यासाठी काही अंगविक्षेप केले. विलक्षण हावभाव केले.

''असेल, मग त्याचं काय?''

''तो तिच्यासाठीच शत्रूपक्षाला मिळाला आहे! मनुष्य एकदा प्रेमात पडला, म्हणजे त्याची अवस्था पायताणाच्या तळव्याप्रमाणे होते, पाण्यात बुडवून कसाही वाकवावा!''

बुल्बा विचारात पडला. तरुणीच्या मोहपाशात सापडून योद्धे कसे निकामी होतात त्याचे स्मरण त्याला झाले. एखाद्या स्तंभाप्रमाणे तो जागच्या जागी खिळून स्तब्ध उभा राहिला. ''ऐका सरदारसाहेब!'' यांकेल फिरून बडबडू लागला, ''मी त्या घरी मोती विकण्यासाठी गेलो होतो आणि तेथील तार्तर दाईने मला सर्वकाही सांगितलं आहे. झापुर्झियन कोसॅकांना हाकलून देण्याचं वचन अँड्रीने शहराधिपतीला दिलं आहे!''

''त्या हरामखोर कार्ट्याला तू जागच्या जागी ठार का केलं नाहीस?'' बुल्बा गरजला.

''ते काय म्हणून? त्याला तिथे इथल्यापेक्षा जास्त बरं वाटलं, म्हणून तो तिकडे गेला, त्याला मारण्याचं मला काय कारण? आणि ते शक्य तरी कसं आहे?''

''तुला तो समोरासमोर भेटला का रे?''

''जरूर भेटला! गडी मोठा रुबाबदार आहे. मी दिसताच तो म्हणाला..''

''तो काय म्हणाला?'' बुल्बाने अधीरपणाने विचारले.

''ए ज्यू व्यापाऱ्या, माझ्या बापाला जाऊन सांग, झापुर्झियन कोसॅक माझे बांधव नव्हेत, मी तुझा मुलगा नाही. मी त्या प्रत्येकाशी लढणार आहे, त्यांना धूळ चारणार आहे!''

''हरामखोरा, तू खोटं बोलतोस! तू पिसाळलेला कुत्रा आहेस, ख्राइस्टला न मानणारी तुझी अवलाद आहे! सैताना, तू इथे क्षणभर तरी थांब, तुझी खांडोळीच करतो!'' असे

गर्जत बुल्बाने खस्कन आपली तलवार उपसली. त्याचा अवतार पाहून तो ज्यू व्यापारी जीव वाचविण्यासाठी टाच लावून पळत सुटला. त्याला मागे वळून पाहाण्याची छाती होत नव्हती, एवढा तो ढेपाळला होता. आपला राग त्या व्यापाऱ्यावर काढण्याची बुल्बास मुळीच इच्छा नसल्याने त्याने यांकेलचा पाठलाग केला नाही.

बुल्बाला त्या रात्रीची पुसट पुसट याद आली. कुठल्या तरी स्त्रीबरोबर आपला मुलगा जात असताना आपण पाहिले होते याचे त्याला स्मरण झाले.

ठरल्याप्रमाणे आपली तुकडी घेऊन बुल्बा दबा धरून बसण्यासाठी शेजारच्या जंगलात निघून गेला. इतर सैनिकी विभागही त्यांना त्यांना नेमून देण्यात आलेल्या कामगिरीच्या पूर्ततेस लागले. मोर्चे बांधले जाऊ लागले. माऱ्याच्या जागा धरून ठेवण्यात आल्या.

शहरातील शत्रूच्या हालचालींची पुसट पुसट कल्पना कोसॅक सैनिकांना येत होती. कोसॅक सैनिकांना आपला दिमाख दाखवून दिपवून टाकण्यासाठी पोलिश लष्करी अधिकाऱ्यांनी आपली सेना एक दिवस तटबंदीवर खडी केली.

पोलिश सैनिकांची पितळी शिरस्त्राणे प्रात:कालच्या उन्हात झगमगत होती. त्यांतील हंसपिसाऱ्याचे पांढरे तुरे वाऱ्यावर डुलत होते. त्यांच्या तांबड्या बनातीचे डगले सळसळत होते. त्यांचा सेनापती मोठा उंचापुरा मजबूत असून त्याने अनेक सुवर्णचिन्हे धारण केली होती. त्याने अधूनमधून आपल्या करड्या आवाजात हुकूम सोडण्याचा सपाटा चालविला होता. शहरात माजलेल्या उपासमारीचा मागमूसही तेथे दिसत नव्हता.

तटबंदीबाहेर, खालच्या बाजूस कोसॅक सेना तरंगत होती. तेथे काडीचाही थाटमाट दिसत नव्हता. उंची कपडे, डामडौल व लढाई यांचा काही संबंध असत नाही, अशी त्यांची धारणा होती. मेंढीच्या कातड्याच्या गोंडेदार काळ्या टोप्या घालून ते वरचा देखावा पाहात होते.

मग त्यांच्यातून मार्ग काढीत दोन कोसॅक सैनिक पुढे आले. ओखिम नॅश व मिकीटा हीच ती तोंडाळ दुक्कल होती. पोलिश सैनिकांना चिथावून त्यांना बाहेर काढण्यासाठीच त्यांची योजना झाली असल्याने ते वर पाहात ओरडले, ''अरेऽ एऽ तांबड्या डगल्यातील भेकडांनो, बाहेर मैदानात या ना, तुमच्या अवसानाचं मोजमाप हां हां म्हणता काढतो! तटावर कशाला मिरवता?''

''थांबाच भागूबाईंनो, आमचं अवसान लवकरच तुम्हाला दाखवतो! तुम्हा साऱ्यांना गुरांप्रमाणे दावणीला बांधतो, तुमच्या दोस्तांची काय अवस्था झाली आहे, त्याचा नमुना आताच दाखवतो तुम्हाला!'' वरचा अधिकारी ओरडला व त्याने काही हुकूम दिला. थोड्याच वेळात दोरीने जखडलेले काही कोसॅक कैदी तटबंदीवर आणून उभे करण्यात आले. रात्री मद्याच्या धुंदीत असताना कैद झालेले झापुर्झियन कोसॅक होते ते! त्यांचा म्होरक्या खलीब सर्वांच्या पुढे होता. त्याने आपली मान लाजेने खाली घातली होती, कारण एखाद्या कुत्र्याप्रमाणे त्याला बांधून खेचून आणण्यात आले होते.

''खलीब, धीर धर. आम्ही तुझी निश्चित सुटका करू!'' खालून कोसॅक ओरडले. ''तुला कुत्र्याप्रमाणे बांधणारी माणसं निलाजरी प्रजा आहे! त्यांची दानत हलकट आहे! झोपलेल्या सैनिकांविरुद्ध लढाई मारणारी ही भेकडांची अवलाद आहे!''

''जरा थांबा लेकाच्यांनो, तुमचीही अशीच अवस्था करून टाकतो!'' वरील लोक ओरडले.

ओखिम आपल्या लोकांकडे वळून ओरडला, ''करतील बुवा! करतील बुवा!! वरचा तो ढेरपोट्या हे नक्कीच करील!''

''ते कसं काय?'' कोसॅक सैनिक ओरडले.

''अरे! त्या अगडबंब लडदूचं पोट एवढं आहे, की त्याच्या आड दडून ही नटवी कुत्री नक्कीच चावा घेतील आपला!''

''हो ऽ हो ऽ हो ऽऽ!'' ओखिमच्या या बडबडीने एकच हशा पिकला!'' एवढ्यात नेता ओरडला, ''दूर व्हा! दूर व्हा!'' कोसॅक मागे हटले न हटले तोच तटावरून बंदुकीची फैर झडली व गोळ्या सणाण् करीत गेल्या. कोसॅक सैन्यात थोडीफार चलबिचल झाली, धांदल उडाली.

एवढ्यात शहरवेशींची दारे उघडली गेली. पोलिश सैनिकांच्या रांगांमधून रांगा बाहेर येऊ लागल्या. अग्रभागी हुस्सार सैनिकांच्या तुकड्या दिसत होत्या. मग्रूर दिसणारे पोलिश सरदार आपल्या घोड्यांवरून मोठ्या डौलाने येत

होते.

''यांची जुळवाजुळव होण्यापूर्वीच द्या धसका!'' नेता ओरडला. ''हलकटांना मुळीच फुरसत देऊ नका!'' धडाधड सागरलाटा याव्यात, त्याप्रमाणे कोसॅक सैनिकांनी चहूबाजूंनी पोलिश सैन्यावर बेफाट हल्ला चढविला व त्यांची विस्कटाविस्कट करून टाकली. गोळीबार करण्याची संधीच त्यांना मिळाली नाही. हातघाईची कचाकची करणे त्यांना भागच पडले.

पोपोविच कोसॅकने झटक्यालाच तिघा पोलिश घोडेस्वारांना कंठस्नान घालून त्यांचे घोडे ताब्यात घेतले. तो म्हणाला, ''छाऽ! काय उमदी जनावरं आहेत!'' कोसॅक योद्‌ध्यांनी पोलिश सैन्याच्या अधिकाऱ्यांना मोजके गाठून त्यांची कत्तल उडविण्याचा सपाटा चालविला. कित्येकांच्या गळ्यात दोरीने फास टाकून त्यांना खाली खेचले व आपल्या घोड्यांना टाच देऊन त्यांना मैदानावर फराफरा ओढीत नेले.

कोसॅकांचेही काही कमी नुकसान झाले नाही. कुकुबेंकोने एक भयंकर गर्जना करून एका पोलिश सरदारावर चाल केली. त्याच्या रणगर्जनेने बिचकलेला त्या सरदाराचा घोडा एकदम मागे हटला. कुकुबेंकोने झाडलेली गोळी थोडक्यात हुकली, पण पाठोपाठ त्याने केलेला वार एवढा जबरा होता, की त्या सरदाराचा हात खांद्यापासून तुटून खाली धुळीत पडला. दुसऱ्या वाराने तर तो पुराच जमीनदोस्त झाला. कुकुबेंकोने तलवार घुसवून त्याला जमिनीला खिळवून टाकले. त्याच्या लाल रक्ताचे थारोळे तेथे पसरले.

''हे नटवे नटून-थटून येतात म्हणून बरं आहे; त्यामुळे चांगलीच लूट मिळते!'' आपण ठार केलेल्या सैनिकाला लुबाडताना बरोडी म्हणाला, पण त्याची ही लूटमार त्याला चांगलीच नडली. किरण साधून एका पोलिश अधिकाऱ्याने केलेल्या वारामुळे त्याचे मस्तक अलगद धडावेगळे झाले.

अशी ही रणधुमाळी दीर्घकाळ चालू होती. बोरोडीनंतर त्याच्या तुकडीचे नेतृत्व ओस्टाप बुल्बाने आपल्याकडे घेतले. त्याने पोलिश सैनिकांत घुसून अशी भयानक कापाकापी केली, की सांगता सोय नाही. पोलिश सैनिकांना पिछेहाट करणेच भाग पडले. एवढ्यात दबा धरून बसलेल्या तुकड्या एकदम चाल करून आल्या. त्यांनी नव्या दमाने, धडाडीने जबरदस्त हल्ला चढविला व मग पोलिश सैन्याने माघार घेऊन फिरून शहराचा आश्रय केला.

या चकमकीत खूपच पोलिश सैनिक गारद झाले. कित्येक झापुर्झियन कोसॅकही कामास आले. पोलिश सैनिकांनी शहराचा आश्रय घेऊन वेशीचे दरवाजे बंद करताच ओस्टाप ओरडला, ''दूर व्हा! दूर व्हा!'' त्याचा हा इशारा बरोबरच होता. आपल्या सैनिकांची माघार सुरक्षित व्हावी म्हणून तटबंदीवरून कोसॅक सैनिकांवर गोळ्यांचा भडिमार चालू झाला होता.

ओस्टापचा आजचा पराक्रम पाहून बुल्बा संतुष्ट झाला होता. कोसॅक सैनिक विश्रांतीसाठी तळावर परतण्याच्या विचारात होते. एवढ्यात पोलिश सैनिक तटबंदीवर गोळा झालेले दिसू लागले. त्यांचा दिमाख आता खलास झाला होता. कपडे फाटले होते. अंगे धुळीने भरली होती.

''थूऽ तुमच्या! आम्हाला बांधणार होता नाही का?'' कोसॅक ओरडले.

''थांबा, दाखवतोच हिसका!'' आपल्या हातातील दोरी फिरवून दाखवीत एक पोलिश सैनिक वरून ओरडला.

''थूऽत्ऽ तुमच्या ....घरात दडून बसता...!'' मग उभयपक्षी दमदाटी, शिवीगाळ यांची सरबत्ती काही काळ झडली. सायंकाळी दोन्ही बाजूंचे सैनिक विश्रांतीसाठी पांगले.

पोलिश सैनिकांचे छिनावून घेतलेले कपडे फाडून कोसॅक योद्धे आपल्या जखमा बांधीत होते. मृत सैनिकांना मूठमाती देऊन आदरांजली वाहाण्यात आली. पोलिश सैनिकांची प्रेते कोल्ह्या-कुत्र्यांना खाण्यासाठी रणांगणावर तशीच पडू देण्यात आली.

सर्व कोसॅक सैनिक रात्रीच्या जेवणाच्या तयारीस लागले. खूप रात्र होईपर्यंत ही पंगत चालू होती. बुल्बा अस्वस्थ होता, त्याच्या मनात अँड्रीचा विचार तरंगत होता. पोलिश योद्‌ध्यांत तो न दिसल्याने, त्या व्यापाऱ्याने आपणास खोटे तरी सांगितले नाही ना, अशी शंका त्यास येऊ लागली. आपल्या जातभाईंविरुद्ध अँड्री हात उचलेल असे त्यास वाटत नव्हते. एखाद्या स्त्रीच्या मोहब्बतीसाठी आपला मुलगा आपल्या मातृभूमीविरुद्ध, जातभाईंविरुद्ध

उठेल, असे त्यास मनापासून वाटत नव्हते. मग अँड्री कोठे असावा? तो काय करीत असावा? त्याचे काय झाले असावे? या विचारांनी तो अस्वस्थ झाला. किती रात्र झाली, कोण जाणे? विचारांच्या तंद्रीत असतानाच आपला डोळा केव्हा लागला, हे त्याचे त्यालाच समजले नाही.

कोसॅक योद्ध्यांची बडबड बेताबेताने आकसू लागली. आगट्यांच्या प्रकाशात जागृत पहारेवाले मोठ्या कसोशीने सर्वत्र बारीक नजर देऊन होते. प्रत्येक हालचाल बारकाईने निरखीत होते. झाल्या प्रकाराची पुनरावृत्ती होऊ देण्यास त्यांची मुळीच तयारी नव्हती.

सूर्योदयालाच हाका झाला. कोसॅक सैनिकांना पाचारण करण्यात आले. विचारविनिमयाची, सल्ला-मसलतीची आवश्यकता एकाएकी निर्माण झाली होती.

त्याचे असे झाले होते. तार्तरी लोकांनी सेचवर अकस्मात हल्ला चढवून कोसॅकांचे मर्मस्थानच उध्वस्त केले होते. त्यांना विरोध करण्यास पुरेसे मनुष्यबळ तेथे नसल्याने त्यांना आयतेच फावल्याप्रमाणे झाले होते. बरेच कोसॅक ठार झाले. काही कैद झाले. तार्तऱ्यांच्या तावडीतून कसाबसा निसटलेला एक कोसॅक ही बातमी घेऊन आला होता. त्याचे कपडे फाटले होते. अंग जागोजाग रक्ताळले होते. तो या तळावर आला कसा, याचेच आश्चर्य वाटावे अशी त्याची एकूण परिस्थिती होती. त्याच्या सर्वांगावर सूज आली होती. बोलण्याचे त्राणही राहिले नव्हते.

भाईबंदांच्या तळावर येताच तो एकदम पालथा पडला. हुंदक्यांनी हिंदकळू लागला. ''सर्वनाश झाला!'' तो कसेबसे म्हणाला.

ही कोसॅक परंपरा होती. असा घाला घालणाऱ्यांचा पाठलाग करून भाईबंदांची सुटका करणे, बदला घेणे ही कोसॅक दानत होती, पण आता परिस्थिती निराळी होती. पोलिश लोकांना सोडून तार्तरी लोकांच्या मागावर जावे की काय, हा प्रश्न होता म्हणून जनसभेची, वडीलधाऱ्यांची सल्लामसलत आवश्यक होती.

आणि म्हणूनच सूर्योदयालाच हाका दिला गेला. कोसॅक सैनिक हाक्यासरशी एकत्र जमले.

●●●

## ८. देशद्रोह्याचा शेवट

''काही वडील माणसांनी आम्हाला यावेळी सल्ला द्यायला हवा आहे.'' काही कोसॅक म्हणाले.

''नेत्यानेच काय ते ठरवावं.'' दुसरे काही म्हणाले.

नेता आपली टोपी काढून जमावापुढे आला. आज तो त्यांच्यापुढे नेता म्हणून येत नव्हता. त्यांचा एक सहकारी म्हणूनच तो आला होता. ''आजच्या आणीबाणीच्या प्रसंगी वडीलधाऱ्या माणसांनी काही सल्ला देणं आवश्यक आहे. प्रसंग बाका आहे! तार्तर लोक किती जलद फडशा पाडू शकतात, याची आपल्याला कल्पना आहे. पोलिश लोकांना आपण हात दाखविला आहे. भुकेने मरणाऱ्या या लोकांना मारण्यात आता स्वारस्य राहिलेले नाही. या शहराचा नाद सोडून आपण आता तार्तर लोकांच्या मागावर जावं हे बरं!''

''चला, तार्तर लोकांवर चाल करूया!'' जमाव ओरडला.

पण बुल्बाला ही कल्पना मुळीच पसंत पडली नाही. तो ओरडून म्हणाला, ''नाही! हा सल्ला ठीक नाही! इथे आपले कित्येक सहकारी पोलिश लोकांच्या कैदेत आहेत. त्यांना त्यांनी हालहाल करून ठार मारावं, अशी का तुमची इच्छा आहे? आमच्या रशियन युक्रेन बांधवांना, त्यांनी ज्या हालआपत्ती भोगावयास लावल्या, त्यांचा बदला घेतल्याशिवाय तुम्ही परत जाणार आहात काय? हाती आलेल्या कैद्यांची पोलिश लोक कशी कत्तल करतात, हे तुम्हास माहीत नाही काय?'' बुल्बाच्या या भाषणाने सैनिकांची मने द्विधा झाली. तार्तर लोकांचा बदला घेण्यास जावे, का पोलिश लोकांचा सूड पुरा करावा, असे कोडे त्यांना पडले. एवढ्यात एक म्हातारा झापुर्झियन कोसॅक पुढे आला व म्हणाला, ''आजपर्यंत मी कधीच भाषण केले नाही, पण आज मात्र मी माझ्या अनुभवाचे चार शब्द

सांगणार आहे. आमच्या कोसॅक वसाहतीवर धाड घालणारे तार्तर अपराधी आहेत. त्यांचा काटा काढलाच पाहिजे; पण आमच्या युक्रेनवर आक्रमण करून आमच्या जमातीचा, देशाचा उपमर्द करणारे, आमच्या श्रद्धांना पायदळी तुडविणारे, पोलिशही महान अपराधी आहेत. या उभयतांनाही शासन झालं पाहिजे. म्हणून मी म्हणतो, ज्यांना सूड घ्यायचा असेल त्यांनी तिकडे जावं व इच्छा असेल त्यांनी इथं राहून पोलिश लोकांवर हत्यार धरावं! आपल्या सैनिकांचे दोन भाग होतील!''

''म्हातारं चांगलंच बिचव दिसतंय!''

''नामी तोडगा काढला म्हाताऱ्यानं!'' सैनिक बोलू लागले.

आरडाओरडा करून त्यांनी म्हाताऱ्याच्या नव्या सूचनेचे स्वागत केले.

''ही योजना आपणास पसंत आहे काय?'' नेत्याने विचारले.

''हो, हो, एकदम पसंत!'' जमाव ओरडला व मग जनसभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

कोसॅक जवानांची विभागणी सुरू झाली. पोलिश लोकांशी लढू इच्छिणाऱ्या जवानांत तो म्हाताराही सामील झाला. तो म्हणाला, ''माझ्या वयामुळे मला तार्तर लोकांच्या मागे धावणं शक्य होणार नाही. मरताना रणांगणात मरावं, एवढीच आता इच्छा आहे, आणि या ठिकाणी मरण्यात विशेष आनंद आहे. खऱ्या ख्रिश्चन धर्मरक्षणासाठी हे मरण आहे.''

अल्पावधीतच सैनिकांची विभागणी पूर्ण झाली. मग निरोप घेण्याचा सोहळा चालू झाला. आलिंगनांचा, चुंबनांचा वर्षाव झाला, वियोगाचे अश्रू ढाळले जाऊ लागले.

''भाई हो, आपली भेट आता फिरून केव्हा होणार, कोठे होणार, देव जाणे!'' ते विभक्त होताना म्हणू लागले.

रात्र झाली. आकाशात तारे चमकू लागले. गाड्या लादल्या गेल्या आणि रिवाजाप्रमाणे, तार्तर लोकांवर निघालेल्या कोसॅकांनी रात्रीचा प्रवास चालू केला. उरलेले कोसॅक ते दिसेनासे होईपर्यंत त्यांच्याकडे टक लावून पाहात होते.

बुल्बा दु:खीकष्टी झाला. कोसॅक सैनिकांची संख्या आता जवळजवळ निम्मी झाली होती. पण कोसॅक मनुष्य संकटाने डगमगत नाही, या विचाराने बुल्बा उत्तेजित झाला. इतरांना उत्तेजित करण्याच्या नादास लागला.

आपल्या गाडीतील व्होडका मद्याची खास टिपे त्याने खाली उतरविली. सैनिकांना एकत्रित करून तो म्हणाला, ''बंधूंनो, या! ह्या उंची मद्याने आपले प्याले भरून घ्या! आपल्यासमोर असलेला लढा जिंकण्यासाठी आपल्याला बराचसा घाम गाळावा लागणार आहे, रक्त सांडावं लागणार आहे! बंधूंनो, आपल्या धर्मश्रद्धांच्या रक्षणासाठी, मातृभूमीच्या मुक्तीसाठी प्राणार्पण करण्याची शपथ आपणास घ्यावयाची आहे!''

सैनिकांनी मद्याचे प्याले भरले व ते उंच धरून ते गर्जू लागले, ''आमच्या धर्मश्रद्धांसाठी, मातृभूमीसाठी!''

''आमच्या भूमीसाठी, सेचच्या प्रतिष्ठेसाठी!'' बुल्बा ओरडला. ''आमच्या भूमीसाठी, सेचच्या प्रतिष्ठेसाठी!'' सैनिकांनी प्रतिसाद दिला. सतत जयघोष झाला आणि सर्वांनी भक्तिभावाने मद्याचा प्याला तोंडास लावला.

कोणी सांगावे, या रणमैदानात आपली हाडे विखुरली जातील. भविष्यकालीन शाहीर आपले पोवाडे गातील. पण त्यापूर्वी आपले मर्त्य देह घारी-गिधाडांकडून, कोल्ह्या-कुत्र्यांकडून वाभारले जातील! पण त्याची काय पर्वा! आपल्या भूमीवरून पोलिश लोकांना हाकलण्यासाठी, आपल्या जातभाईंवरील अन्यायाचा सूड घेण्यासाठी रणकंदन केलेच पाहिजे! शांत रात्री, पडल्या पडल्या, कोसॅक योद्धे विचार करीत होते.

झापुर्झियन कोसॅकांची निम्मीअधिक सेना तार्तर लोकांच्या मागावर गेली आहे, याची शहरात कोणासच कल्पना नव्हती. मनोऱ्यावर उभे राहून टेहळणी करणाऱ्या टेहळ्यांनी कोसॅक तळावरील गाड्यांची संख्या कमी झाल्याची वार्ता दिली. सैनिकसंख्याही रोडावल्याचे सांगितले, पण लष्करी अधिकाऱ्यांचा विश्वास बसेना. त्यांची अशी कल्पना होती, की कोसॅक लोकांची ही एक हुलकावणी असून ते जंगलात कोठे तरी दबा धरून बसले असतील.

पण पोलिश लोकांना काही ना काही करणे भाग होते. नागरिकांची उपासमार होत होती. भूकबळींची संख्या

वाढत होती. काही साहसी लष्करी अधिकाऱ्यांनी, निवडक सैनिकांच्या साहाय्याने कोसॅक फळी फोडण्याचा प्रयत्न करण्याचा निर्णय केला व तशी धडकही मारून पाहिली. पण कोसॅक झपाट्यापुढे त्याचा काहीच उपयोग झाला नाही. काही माणसे गमावून त्यांना माघार घ्यावी लागली. पण या चढाईचा एक फायदा मात्र निश्चित झाला. टेहळ्यांनी सांगितलेल्या वार्ता खऱ्या असून, कोसॅक सैनिकांची संख्या खरोखरच रोडावली आहे, याची त्यांना कल्पना आली. कोसॅक वेढ्यावर एक जबरदस्त हल्ला चढवून तो मोडून काढण्याचा निर्णय त्यांनी केला.

इकडे बुल्बाही काही स्वस्थ नव्हता. एखादा मोठा व निर्वाणीचा हल्ला येणार, हे ओळखूनच तो तयारी करण्यात गुंग होता. सैनिकांना चेतावणी देण्याचे काम त्याने सतत चालू ठेविले होते. तो म्हणत होता, ''आपल्यातील बंधुत्वाची भावना, हीच आपली खरी ताकद आहे. आईबाप आपल्या अपत्यांवर प्रेम करतात, पण आपलं परस्परांतील प्रेम आगळं आहे. ही आत्मिक-एकात्मता आहे! आपल्या रशियन भूमीचं हे वैशिष्ट्य आहे. तिचा हा गुणविशेष आहे! रशियन लोकांत आढळणारी बंधुता, प्रेम जगात इतरत्र कुठेच आढळणार नाही!'' बुल्बा जोरजोराने हातवारे करीत होता. ''या पोलिश लोकांनी आमच्यावर लत्ताप्रहार केला. त्यांच्या पिवळ्या बुटांखाली आमचे भाईबंद चिरडले, पण त्यांना रशियन भूमीतच धूळ चारली जाईल!'' बुल्बाच्या या भाषणानंतर सर्वत्र शांतता पसरली. मुठी आवळल्या गेल्या. ओठ दातांखाली रगडले गेले. मारू अगर मरू या भावनेने कोसॅक सेना भारावली गेली.

एवढ्यात पोलिश सैनिकांची हालचाल दिसू लागली. तुताऱ्यांचे निनाद झाले. पडघम वाजू लागले. पोलिश सैनिक रांगेरांगेने वेशीबाहेर येऊन कोसॅक तळाकडे चाल करू लागले. त्यांची शिरस्त्राणे चमकत होती. हत्यारे भयानक रितीने परजली जात होती. पोलिश सैनिक गोळीबाराच्या टप्प्यात येताच, लांब नळीच्या कोसॅक बंदुका कडाडू लागल्या. क्षणाची उसंत न घेता त्यांचा भडिमार सातत्याने चालू होता. बंदुकीच्या आवाजाने आसमंत हादरले. धुराने झाकळून गेले. मागील लोक बंदुका भरून तयार ठेवीत व पुढील सैनिक गोळीबार करीत. गोळीबार इतक्या जलद कसा होऊ शकतो, हे शत्रूपक्षाला कोडेच होते.

कोसॅक लोकांच्या या करामतीमुळे, पोलिश लोकांच्या दिमतीस असलेला फ्रेंच तज्ज्ञही थक्क झाला. या भडिमारातून सुटण्यासाठी त्याने कोसॅक तळावर तोफा डागण्याचा निर्णय केला. पोलिश तोफखाना आग ओकू लागला. तोफांच्या गर्जनांनी रणभूमी हादरून गेली. प्रथम तोफांची तोंडे वर असल्याने गोळे कोसॅक तळापलीकडे जाऊन पडू लागले. त्यामुळे खवळलेल्या फ्रेंच तज्ज्ञाने तोफखान्याचे नियंत्रण स्वत:कडे घेतले. बुल्बाला धोक्याची शंका येताच त्याने आपल्या सैनिकांना गाडीतळापासून दूर सरकण्याची आज्ञा दिली.

प्रचंड तोफेने आपल्या वासलेल्या जबड्यातून आग ओकण्यास सुरुवात करताच हाहाकार उडाला. बुल्बाला वाटले, कित्येक कोसॅक माता आपल्या लेकरांसाठी आपल्या सुरकुतलेल्या छात्या पिटून शोक करणार! सरळ हल्ला चढवून तोफखाना बंद पाडल्याशिवाय गत्यंतरच राहिले नाही.

ओस्टाप, कुकुबेंको, शिलो, सारेच कोसॅक योद्धे पोलिश सैनिकांची फळी फोडून तोफखाना बंद पाडण्याच्या विचारास लागले. त्यांनी आपले सैनिक एकत्र करून पोलिश सैनिकांवर झंझावाती हल्ला चढविला. त्यांच्या तलवारींचे आघात इतके जबरदस्त होते की, पोलिश सैनिकांची शिरस्त्राणे फोडून त्यांच्या मस्तकांच्या चिंधड्या होत. झापुर्झियन कोसॅकांचा हा रट्टा सहन करणे, पोलिश सैनिकांना अशक्यप्राय होऊ लागले.

''हे घे कुत्र्या!'' असे म्हणत शिलोने एका पोलिश अधिकाऱ्यावर आघात केला, पण तेवढ्यात दुसऱ्या एका पोलिश सैनिकाने शिलोच्या मानेवरच कट्यारीने आघात केला. आपणास प्राणघातक जखम होताच शिलो ओरडला, ''नमस्कार बंधूंनो! आमची पवित्र रशियन भूमी चिरंजीव होवो!'' एवढे बोलून त्याने धरणीवर अंग टाकले.

पोलिश सैनिकांच्या मानाने कोसॅक लोकांची संख्या अगदीच कमी असल्याने, पराक्रमाची शर्थ करूनही निभाव लागेल किंवा नाही अशी शंका निर्माण झाली. कुकुबेंकोने एका पोलिश लष्करी अधिकाऱ्यावरच हल्ला चढविला होता. त्याने रणांगणातूनच पळ काढण्याचा प्रयत्न केला, पण

कुकुबेंकोने त्याची पाठ सोडली नाही. त्याने आपली फासदोरी फेकून त्याचा गळा गुंतविला. फास लागताच त्या अधिकाऱ्याचा चेहरा हिरवा पिवळा झाला. कुकुबेंकोने त्याला घोड्यावरून खाली खेचले व त्याची फरपट काढण्यास सुरुवात केली; एवढ्यात कोणीतरी झाडलेल्या गोळीमुळे कुकुबेंकोची छाती फुटली. त्याचे लालभडक रक्त त्याच्या छातीवरून भळभळ ओघळू लागले. खाली कोसळता कोसळता तो ओरडला, ''नमस्कार बंधूनो! नमस्कार. माझ्यासाठी शोक करू नका! आपल्या रशियन भूमीच्या वैभवासाठी मरा!''

एकामागून एक कोसॅक योद्ध्यांचा निकाल लागताना पाहून बुल्बा कासावीस होत होता, तरीही तो ओरडत होता, ''कोसॅक तलवारींची धार अद्यापि शाबूत आहे. आमच्या बंदुकी अद्यापि ठासलेल्या आहेत! आमची जिद्द अद्यापि शाबूत आहे! कोसॅक मोडतील पण वाकणार नाहीत!'' फिरून हातघाई चालू झाली. ''कोसॅक शक्ती दबलेली नाही. कोसॅकांना शरण जाणे माहीत नाही!'' तो सारखा गर्जत होता. कचाकची करीत होता.

रणभूमीवर रक्ताचे पाट वाहात होते. बुल्बाने आपला हातरुमाल हवेत फेकला. आणि तत्काळ शेजारच्या जंगलात दबा धरून बसलेल्या कोसॅक तुकड्या विद्युतवेगाने पोलिश सैन्यावर तुटून पडल्या. पोलिश सैन्याची दाणादाण झाली. नगरवेशीच्या दिशेने ते मागे हटू लागले.

''आमचा विजय झाला! आमचा विजय झाला!'' रणमदाने धुंद झालेले कोसॅक सैनिक ओरडू लागले.

''नाही! अद्यापि आपला विजय झाला नाही!'' नगरवेशीकडे पाहात बुल्बा ओरडला.

वेशीचे दरवाजे उघडले गेले. ताज्या दमाच्या हुस्सार घोडदळाच्या तुकड्या वेशीतून बाहेर पडत होत्या. त्यांचे नेतृत्व करणारा तरुण योद्धा अग्रभागी होता. त्याच्या घोड्याचा थयथयाट चालू होता. त्याचा रुबाब लोकविलक्षण होता. कोसॅक सैनिकांवर निर्वाणीचा हल्ला चढवून त्यांची धुळधाण उडविण्याच्या ईर्षेने तो फुरफुरत होता.

त्या योद्ध्याकडे नजर जाताच बुल्बा ओरडला, ''सैतानाची अवलाद! आपल्या जातभाईंवर हत्यार उगारणारा हलकट!'' पण अँड्रीचे, त्या योद्ध्याचे - लक्ष बापाच्या गर्जनेकडे मुळीच नव्हते. कोसॅक सैनिकांना धूळ चारून आपल्या पोलिश प्रेयसीला संतुष्ट करण्यासाठी तो आसुसलेला होता.

''हेऽ! या पोराला हुलकावणी देऊन जरा बाजूस काढा!'' बुल्बाने आपल्या सैनिकांस इशारा दिला आणि हां हां म्हणता तीस कोसॅक जवान प्रचंड गतीने घोडदौड करीत हुस्सार घोडदळावर येऊन आदळले. त्यांतील एका तरुण योद्ध्याने, आसूड मारावा त्याप्रमाणे पालथ्या तलवारीचा एक जबरदस्त फटकारा अँड्रीच्या पाठीवर मारला व त्याने आपला घोडा जंगलाच्या दिशेने पिटाळला.

आपल्या सैनिकांच्या देखत आपला असा उपमर्द व्हावा, हे अँड्रीला सहन झाले नाही. त्याचे रक्त तापले, मस्तक भिरभिरू लागले. तत्काळ त्याने त्या कोसॅक सैनिकाचा पाठलाग चालू केला. आपण आपल्या सैनिकांपासून अलग पडत आहोत, याचे भानही त्याला राहिले नाही. तो त्या सैनिकाच्या मागे तडक जंगलात शिरला आणि एकदम त्याचा मार्ग रोखला गेला.

म्हातारा तारस बुल्बा त्याचा मार्ग रोखून उभा होता. मुलाकडे निरखून पाहात तो म्हणाला, ''बोल पोरा, आता काय करायचं?'' अँड्री काहीच बोलू शकला नाही. जमिनीकडे पाहात मुकाटवाणी तो खडा राहिला.

''बोल पोरा, पोलिश लोकांनी तुला काय दिलं? कोणती मदत केली? कशासाठी तू आपल्या मातृभूमीशी, धर्मश्रद्धेशी, जातभाईंशी, बेइमानी केलीस? घोड्यावरून खाली उतर!''

आज्ञाधारक मुलाप्रमाणे अँड्री घोड्यावरून खाली उतरला. त्याचा चेहरा पांढरा पडला होता. ओठ थरथरत होते. बुल्बाने खांद्याला लटकाविलेली बंदूक काढली.

''कडाड्ऽ!'' बुल्बाच्या बंदुकीने गर्जना केली व विळ्याने छाटलेल्या गवताच्या काडीप्रमाणे त्याचा मुलगा अँड्री निर्जीव होऊन खाली कोसळला.

''कोसॅक राहिला असतास तर नाव केलं असतंस पोरा! पण आज कुत्र्याच्या मौतीने मेलास!'' त्याच्या प्रेताकडे पाहात बुल्बा तुच्छतेने म्हणाला. एवढ्यात ओस्टाप तेथे दौडत आला. भावाची ती अवस्था पाहून त्याचे अंत:करण

भरून आले. ''बाबा! तुम्ही काय केलंत?'' तो गहिवरून म्हणाला,''निदान त्याला आता मूठमाती तरी देऊया!''

''जरूर नाही! त्याला मूठमाती देणारे, त्याच्यासाठी रडणारे, त्या शहरात पुष्कळ आहेत!''

''घात झाला! घात झाला'' एक कोसॅक योद्धा दौडत येऊन म्हणाला, ''पोलिश लोकांना जादा कुमक येत आहे. आपली वाताहत होत आहे.'' पाठोपाठ दुसरा आला, तिसरा आला आणि प्रत्येकाने एकच बातमी दिली. आणि तिची सत्यताही लगेच प्रत्ययाला आली. त्या सर्वांना पोलिश सैनिकांचा वेढा पडला.

''ओस्टाप! ओस्टाप! फळी फोडून नीघ!'' बुल्बा ओरडला, पण पोलिश सैनिकांचा वेढा आवळतच चालला.

''ओस्टाप, ओस्टाप, घूस, पुढे घूस'' बुल्बाने त्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी रणकंदन माजविले, पोलिश सैनिकांची मुंडकी उडू लागली, बरगड्या मोडू लागल्या, हात निखळून पडू लागले.

''ओस्टाप, ओस्टाप, मार्ग काढ!''

पण प्रचंड संख्येने आलेल्या पोलिश सैनिकांनी ओस्टापला घेरले होते, नामोहरम करीत आणले होते. त्याच्या गळ्याभोवती फास टाकून त्याला खाली खेचले होते. त्याची गठडी वळण्यासाठी पाच पन्नास सैनिक झटत होते.

बुल्बा तडफडत होता, त्याच्याकडे जाण्यासाठी मार्ग काढावा म्हणून बेहोष खणाखणी करीत होता. एवढ्यात थडाड् करून त्याच्या तोंडावर कसला तरी जबरदस्त आघात झाला. त्याचे मस्तक गरगरले. घोडी, माणसे उलटीपालटी होताना दिसू लागली. तो घोड्यावरून खाली कोसळला. पुढे काय झाले हे त्याचे त्यालाच समजले नाही.

●●●

## ९. वार्सात

''मी किती वेळ झोपलो आहे?'' भिरभिरत्या नजरेने आजूबाजूला पाहात बुल्बाने विचारले. त्याला काय झाले आहे कळत नव्हते, कशाचाच उलगडा होत नव्हता. तो गलितगात्र झाला होता. त्याने समोरच बसलेल्या तोकाशवर आपली नजर स्थिर केली. तोकाशने त्याला गप्प बसण्याची सूचना केली.

''पण मी कुठे आहे?'' घडलेल्या घटनांची संगती लावण्याचा प्रयत्न करीत बुल्बाने विचारले.

''गप्प बस!'' तोकाश खेकसला. ''तुझ्या सर्वांगावर झालेल्या जखमांनीही, तुला काय झालं आहे हे कळत नाही काय? गेले चार दिवस तुला ताप होता आणि तू सारखा बडबडत होतास! आताच तुला जरा शुद्ध आली आहे, तेव्हा आता स्वस्थ पडून राहा!''

''आपण पोलिश लोकांच्या तावडीत सापडलो आहोत काय?''

''गप्प बैस म्हटलं ना, आपणास अद्यापि बरीच मजल मारायची आहे. तुला मोठ्या मिनतवारीने आम्ही काढून आणलं आहे आणि अद्यापि आपणाला चोरून-मारून, लपत-छपत, प्रवास करायचा आहे! तुला पकडून देण्यासाठी पोलिश लोकांनी दोन हजार सुवर्णमुद्रांचं इनाम देऊ केलं आहे!''

''माझा ओस्टाप कुठे आहे?'' बुल्बा उठण्याचा प्रयत्न करीत कळवळून म्हणाला. ओस्टापच्या आठवणीने तो कळवळून गेला. त्याने जखमांवर बांधण्यात आलेल्या पट्ट्या खसखसा ओरबाडून काढण्यास सुरुवात केली. जणू त्याला वाताचाच झटका आला होता. त्याच्या सहकाऱ्यांनी त्याच्यावर झडप घातली. फिरून त्याला मलमपट्टी केली व त्याला खचाटून टाकले. त्याच्या आततायीपणाबद्दल त्याच्यावर शिव्यांचा भडिमार केला.

''जिवंत अगर मृत ओस्टाप माझ्या हाती लागलाच पाहिजे. त्याच्या कोसॅक हाडांचा, पोलिश लोकांकडून मी उपमर्द होऊ देणार नाही! ते त्याचे तुकडे तुकडे करतील. त्याचं मढं ते घारी-गिधाडांना खाऊ घालतील! त्याचा जिवंत अगर मृत देह मला युक्रेनमध्ये आणलाच पाहिजे!''

बुल्बा तडफडून ओरडला. त्याच्या या त्राग्याने त्याचे सहकारी दु:खीकष्टी झाले. रात्रंदिवस घोडदौड करून त्यांनी बुल्बाला अर्धमेल्या अवस्थेत सेचमध्ये आणले. अनेक औषधी वनस्पतींचे रस काढून त्याच्या जखमा नव्याने बांधण्यात आल्या. त्याला बरा करण्यासाठी सर्वांनी हाडांची काडे केली आणि मग एक दिवस म्हातारा बुल्बा फिरून उठून उभा राहिला. हिंडू-फिरू लागला. ओस्टापचा शोध घेण्याची वार्ता करू लागला.

यानंतर झापुर्झियन कोसॅकांनी नीपर नदीतून आपल्या होड्या हाकारल्या व आशिया-मायनरवर हल्ला चढविला. मुस्लिमांवर सूड काढण्याचा चंग त्यांनी बांधला होता. बुल्बा या चढाईत सामील झाला होता, पण त्याचे मन लागत नव्हते. कोसॅक द्राक्षांचे मळे उध्वस्त करीत होते. मशिदींचे रूपान्तर उकिरड्यांत करीत होते. उंची मखमली कपड्यांची पोतेरी करीत होते. पण बुल्बाला या कशांत रस वाटत नव्हता.

''ओस्टाप, ओस्टाप'' तो सारखा घोकत होता. काळ्या समुद्राच्या चमकणाऱ्या पाण्याकडे उदासपणे पाहात बसून कंटाळवाणे जिणे कंठीत होता. ''आता काय वाटेल ते होवो, मी ओस्टापचा तपास काढण्यासाठी जाणारच!'' तो म्हणत होता. आणि असाच एके दिवशी कोणालाच न जुमानता तो ओस्टापचा तपास काढण्यासाठी एकटाच निघाला. सर्व तयारीनिशी घोड्यावर स्वार होऊन त्या अफाट पसरलेल्या गवताळ प्रदेशात अदृश्य झाला.

सुमारे आठएक दिवसांनी तो उमान येथे येऊन दाखल झाला व एका गलिच्छ झोपडीपुढे येऊन उभा राहिला. झोपडीच्या दारापाशीच एक वृद्ध ज्यू स्त्री काही काम करीत होती. घोड्यावरून खाली उतरत बुल्बाने विचारले, ''म्हातारे, नवरा घरी आहे का?''

''होय!'' म्हातारी उत्तरली.

''कुठे आहे?''

''आतल्या खोलीत प्रार्थना करीत बसला आहे.''

बुल्बा सरळ आत घुसला. म्हातारा ज्यू व्यापारी यांकेल तोंडावर घुंगट घेऊन प्रार्थना करीत बसला होता. बुल्बाची हालचाल ऐकताच त्याने प्रार्थना आटोपती घेतली. घुंगट काढून तो पचकन् थुंकला व बुल्बाकडे आऽ वासून आश्चर्याने पाहू लागला. पोलिश लोकांनी लावलेले दोन हजार सुवर्णमुद्रांचे बक्षीस त्याच्या डोळ्यापुढे नाचू लागले.

''काय रे यांकेल?'' बुल्बा बोलू लागला. ''मी एके काळी झापुर्झियन कोसॅकांच्या कचक्यांतून तुझे प्राण वाचवले आहेत ना? मी नसतो, तर त्यांनी तुला एखाद्या पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे ठेचून मारलं असतं. आज मला तुझी गरज आहे. तेव्हा तू मला मदत करायला हवी!''

''मदत? आणि मी कसली मदत करणार महाराज?''

''वेळ घालवू नकोस. मला वार्साला घेऊन चल बघू!''

''वार्साला?'' यांकेल आश्चर्याने ओरडला.

''हो, वार्साला! बडबड करण्यात वेळ घालवू नकोस! मला एकदाच त्याला भेटायचं आहे. त्याच्याशी बोलायचं आहे.''

''कुणाला भेटायचं आहे? कुणाशी बोलायचं आहे?''

''माझ्या मुलाशी! ओस्टापशी!''

''महाराज आपल्याला माहीत नाही का?''

''मला सगळं माहीत आहे. माझ्यावर दोन हजार सुवर्णमुद्रांचं बक्षीस लावण्यात आलं आहे; पण मी आताच तुला दोन हजार सुवर्णमुद्रा देत आहे.'' असे म्हणून बुल्बाने त्याच्या पुढ्यात सुवर्णमुद्रांची रास ओतली.

''ओहो! ओहो!'' यांकेल हर्षभराने ओरडला व मग भानावर येऊन म्हणाला, ''सरकार, आपणाकडून मी कशाची अपेक्षा करणार? पण पोलिश लोक मोठे हरामखोर आहेत. जर यदाकदाचित् त्यांना शंका आली तर भलताच प्रसंग ओढवायचा!''

'' ते मला काही माहीत नाही. मला वार्सा शहराची माहिती नाही. कोणीतरी माहितगार मनुष्य बरोबर हवा, म्हणून मला तुझी सोबत हवी आहे.''

''सरकार, तुम्हाला असं उघड उघड येणं अवघड आहे. निष्कारण आपत्ती येईल. तुमच्यासकट माझंही डोकं मारलं जाईल!''

नाही-होय करता करता, बुल्बाला वेषान्तर करून व लपवून छपवून वार्साला घेऊन जाण्यास यांकेलने संमती दिली. यानंतर सायंकाळच्या सुमारास उमानमधून एक घोडागाडी बाहेर पडली व वार्साच्या दिशेने निघाली. या घोडागाडीत बरेचसे इमारती सामान लादले होते.

सामानाच्या ढिगाऱ्याआड बुल्बा अंग चोरून दडून बसला होता. यांकेल गाडी हाकीत होता.

यांकेलच्या गाडीने वार्सा शहरात प्रवेश केला. गाडीतील इमारती सामान पाहून, वेशीवरील द्वाररक्षकांनी विशेष चौकशी केली नाही. नगराच्या रस्त्यावरील कोलाहल दडून बसलेल्या बुल्बाच्या कानावर पडत होता. हवा इतकी ढगाळ होती, की या शहरावर सूर्य कधी उगवतो की नाही, याचीच शंका यावी. या शहराचे एकूण दृश्य जरा भकासच दिसत होते. अधूनमधून यांकेल पादचाऱ्यांना व रस्त्यात पडलेल्या घाणीला, अडगळीला उद्देशून शिव्या घालीत होता. शेवटी त्यांची गाडी एका गलिच्छ वस्तीत येऊन पोचली. आतापर्यंतच्या प्रवासाने अवघडलेला बुल्बा कसा बसा बाहेर आला. बाहेर येताच त्याने ओस्टापबद्दल विचारणा चालू केली.

यांकेल एके दिवशी त्याला म्हणाला, ''येथील तुरुंगांत बरेच कोसॅक कैदी आहेत, त्यांत ओस्टाप असण्याची शक्यता आहे.''

दुसरे दिवशी यांकेलने अनेक खटपटी लटपटी केल्या. कोसॅक कैदी दृष्टीस पडावेत म्हणून शिपायांपासून तो तुरुंगाधिकाऱ्यापर्यंत अनेकांना लाचलुचपत देऊ केली, पण कैदी दृष्टीस पडण्याचे कोणतेच चिन्ह दिसेना. लवकरच या कैद्यांची जाहीर कत्तल होणार असल्याने, त्यांना कडेकोट बंदोबस्तात ठेवण्यात आले होते आणि त्यामुळे कोसॅक कैद्यांचे साधे दर्शनही दुर्मीळ होऊन बसले होते. आलेल्या या अपयशामुळे बुल्बा अत्यंत निराश झाला. त्याचे डोळे आग पाखडीत होते, पण या संतापाचा काही एक उपयोग नव्हता. उलट त्याच्यावरच संकट येण्याची भीती मात्र होती. शेवटी तो म्हणाला, ''ठीक आहे, ठीक आहे! आपण कत्तलीच्या वेळी उपस्थित राहू. निदान त्या ठिकाणी तरी मला माझ्या मुलाचं दर्शन होईल!''

''महाराज, तिथे जाऊन काय करणार? त्याला जरी तिथे आणण्यात आलं, तरी त्याला आपण वाचवू शकणार नाही. त्यास आपण कोणतीही मदत करू शकणार नाही.''

''ते काहीही असलं तरी मी तिथं जाणारच!'' बुल्बा दृढ निश्चयाने म्हणाला.

ठरल्या दिवशी बुल्बा व यांकेल कत्तल-चौकात येऊन दाखल झाले. हा भीषण तमाशा पाहाण्यासाठी चौकात लाखो लोकांची गर्दी उसळली होती. या गर्दीत स्त्रियांचाही भरणा मोठा होता. असला क्रूर देखावा पाहाण्यात स्त्रियांनीसुद्धा उत्सुकता दाखवावी, याचे बुल्बाला मोठेच आश्चर्य वाटले. नगररक्षकांनी सर्वत्र कडेकोट बंदेबस्त ठेवण्याची कोशीस चालविली होती.

बुल्बा यांकेलसह एका तरुण जोडप्यापाशी उभा होता. नवरा आपल्या बायकोला, होणाऱ्या प्रकाराची मोठ्या कौतुकाने माहिती देत होता. ''हे पाहा इझेपा, ही सारी गर्दी कोसॅक गुन्हेगारांची कत्तल पाहाण्यास जमली आहे. हातात परशू घेऊन उभा असलेला माणूस शिक्षेची अंमलबजावणी करणारा चांडाळ आहे. कैद्यांचे हाल-हाल करण्यासाठी लागणारी आवश्यक ती सर्व साधनं त्याने आपल्यापाशी तयार ठेविली आहेत. शेवटी तो गुन्हेगारांचं मुंडकं छाटील व मग तो गुन्हेगार दु:खमुक्त होईल!'' त्याचे हे सर्व भाषण त्याची पत्नी इझेपा मोठ्या कौतुकाने ऐकत होती. उत्सुक नागरिक घरांच्या छपरांवरसुद्धा दाटीवाटीने बसले होते. खिडक्या-खिडक्यांमधून डोकावीत होते.

इतक्यात गर्दीतून एकच ओरडा झाला, ''कैदी आणले, कैदी आणले!'' कडेकोट बंदोबस्तात कोसॅक कैद्यांचा जथा आणण्यात आला. कैदी धीमेपणाने चालत होते. भीतीचे लवमात्र चिन्ह त्यांच्या डोळ्यांत वा मुद्रेवर दिसत नव्हते. त्यांच्या दाढ्या, जटा वाढलेल्या होत्या. अंगावरील कपडे मळून गेले होते, त्यांच्या फाटून चिंध्या झालेल्या होत्या. पण त्यांच्या चालीचा दिमाख काही और होता. या कैद्यांच्या अग्रभागीच ओस्टाप दिसत होता. त्याला पाहून बुल्बाच्या अंत:करणात कालवाकालव झाली; पण त्याने परिस्थिती जाणून आपल्या भावनांना आवर घातला. आपण मागे राहिलो, तरच ओस्टापच्या यातनांचा सूड घेणे शक्य होईल, याची जाणीव त्यास पुरेपूर होती.

वधस्तंभापाशी येताच ताठ उभा राहून ओस्टाप आपल्या सहकाऱ्यांना उद्देशून म्हणाला, ''बंधूंनो, कितीही हाल होवोत, दु:खाचा एकही शब्द वा सुस्कारा तोंडातून काढू नका. ख्रिश्चन माणसाच्या दु:खाचा सुस्कारा येथे जमलेल्या दांभिक पाप्यांच्या कानावरही पडता कामा नये!''

''वा रे बहाद्दर!'' बुल्बा मोठ्या अभिमानाने स्वत:शी

म्हणाला. चांडाळाने ओस्टापच्या अंगावरील फाटके कपडे टराटर वाभारून काढले. फडाड् फडाड् त्याचा आसूड गर्जू लागला. असंख्य फटकारे ओस्टापच्या उघड्या अंगावर बसू लागले. पण ओस्टाप शांत होता. हुं की चूं करीत नव्हता.

मग त्याला खाली पाडण्यात आले. अवजड धुमसाच्या साहाय्याने त्याच्या हातापायांची हाडे कडाकड मोडण्यात आली. हा भयानक देखावा पाहून सारा जमाव हादरून गेला. पण धिप्पाड ओस्टाप या सर्व यातना सोशीत होता. चेहेऱ्यावर दु:खाची किंचितही छटा दाखवू देत नव्हता. त्याच्या हाडांचा चक्काचूर चालू असता स्त्रियांनी तोंडे फिरविलेली दिसत होती. ''शाबास पोरा! शाबास!'' बुल्बा पुटपुटत होता. जागच्याजागी संतापाने जळत होता.

लोळा गोळा झालेल्या ओस्टापला शिरच्छेदासाठी वधस्तंभावर चढविण्यात आले. ओस्टापने आपली नजर एकदा जमावावर फिरविली. सर्वत्र परकीय चेहेरे दिसत होते. त्याच्याकडे आत्मीयतेने पाहाणारा कोणीच दिसत नव्हता. आपला हा अंत पाहाण्यासाठी, दु:खाने हळहळण्यासाठी आपले कोणीच या जमावात नाही, यामुळे तो हळहळला, व्याकूळ झाला व कळवळून ओरडला, ''बाबा, तुम्ही कुठे आहात? बाबा, बाबा, माझी हाक तुम्हाला ऐकू येत नाही कशी?''

''होय पोरा, ऐकू आली आहे! आणि येत राहील!'' बुल्बा घनगंभीर आवाजात गरजला. लाखो लोकांत पसरलेली प्रगाढ शांतता या गर्जनेमुळे एकदम भंग पावली.

रक्षक घोडेस्वार एकदम गर्दीत घुसले. गर्जना करणाऱ्याचा मागोवा घेण्यासाठी जमाव पिंजून काढू लागले. यांकेल मृत्यूने झपाटल्याप्रमाणे पांढरा फटफटीत पडला होता. त्याने घाबरून मागे पाहिले, पण बुल्बा तेथे नव्हता. तो अदृश्य झाला होता. कोठे गेला? कसा गेला? देव जाणे! पण तो कोणाच्या हाती मात्र लागला नाही.

●●●

## १०.शेवट

बुल्बा वार्सा शहरातून अदृश्य झाला. पण तो सुखासुखी अदृश्य झाला नव्हता. अल्पावधीतच सुमारे दीड लाख कोसॅक सेना जमा करून तो युक्रेनच्या सरहद्दीवर खडा झाला. टोळ्या-टोळ्यांनी हल्ले चढविणारी विस्कळीत कोसॅक सेना आता नव्हती. पोलंडवर चढाई करण्यासाठी संघटित झालेला प्रचंड सेनासागर आज तेथे खडा होता. सुसज्ज होता. येईल त्याला मोडून काढण्यास सिद्ध झाला होता. त्यांची मातृभूमी पायदळी तुडविणाऱ्यांना, त्यांच्या जातभाईंना हैराण करणाऱ्यांना ठेचून टाकण्यासाठी, नेस्तनाबूत करण्यासाठी ही सेना सज्ज झाली होती. आपली धर्ममंदिरे, आपल्या श्रद्धा, आपले पूर्वज यांना तुच्छ लेखणाऱ्या व त्यांची ससेहोलपट करणाऱ्या पोलिश सत्तेला कोसॅकी हिसका दाखविण्यासाठी युक्रेन या सेनेच्या रूपाने खडा झाला होता.

ओस्ट्रॅनिश हा तरणा जवान कोसॅक या सेनेचं आधिपत्य करीत होता, तर बुल्बाकडे एका मोठ्या सेनाविभागाचे नेतृत्व होते. कित्येक कोसॅक लष्करी अधिकारी या उभयतांच्या हाताखाली काम करीत होते. घोडदळ, पायदळ, बैलगाड्या, तोफा, बंदुका यांची रेलचेल होती. कोणतीही उणीव राहाणार नाही, याची संपूर्ण दक्षता घेण्यात आली होती. नीपर नदीच्या आसमंतातील सर्व विभागांतून गोळा झालेले कोसॅक या सेनेत सामील झाले होते. बुल्बाचे वृद्ध व्यक्तिमत्व मोठे उठून दिसत होते. त्याचे युद्धकौशल्य, त्याचा अनुभव, त्याची जिद्द सर्वांना परिचित होती. त्याची निर्भयता, शत्रूवर सूड घेताना दिसून येणारा त्याचा भयानक क्रूरपणा सर्वांनाच चकित करीत होता.

या कोसॅक सेनेने घातलेल्या धुमाकुळाच्या वर्णनांनी इतिहासाची पाने रंगली आहेत. एखादा प्रचंड डोंगरकडा सरकत पुढे यावा, त्याप्रमाणे ही सेना शत्रूमुलुखात सरकत होती. प्रतिकारासाठी येणाऱ्या शत्रूसेनेचा हां हां म्हणता चक्काचूर उडत होता. या सैन्याला कशाचीच पर्वा नव्हती. जाळपोळ, लूटमार, कत्तल यांतून काहीही, कोणीही सुटू

शकत नव्हते. कोसॅकांच्या दणक्यामुळे पोलिश सेनानी हादरून गेले. शांततेची, तहनाम्याची याचना करू लागले. पण या याचनांना कोसॅक भीक घालण्याचे कोणतेच चिन्ह दिसेना. त्यांनी पोलिश सेनानी मिकोंझी याला त्याच्या सेनेसह पोलोनी शहरात घेरले. शहराचा व पोलिश सेनेचा संपूर्ण नाश अटळ झाला.

मिकोंझीने रशियन धर्मगुरूकडे मध्यस्थीची याचना केली आणि मग एके दिवशी रशियन धर्मगुरूंचा जथा कोसॅक सेनेला सामोरा आला. मोठ्या समारंभाने सामोरा आला. हा लवाजमा पाहून कोसॅक सेनानी विरघळले. त्यांनी पोलिश सेनानींची तहनाम्याची याचना मान्य करण्याचा विचार चालू केला. एकट्या बुल्बाचाच या गोष्टीला कडवा विरोध होता. रशियन धर्मगुरूंनी आणलेले हे दडपण त्याला मान्य नव्हते. तो रागारागाने, आपल्या डोक्याचे पांढरे केस तडतडा तोडीत ओरडला, ''सेनाधिकाऱ्यांनो, तुमचं हे कृत्य बायकी आहे! पोलिश लोक विश्वासघातकी आहेत! ते तुमचा घात केल्याशिवाय कधीही राहाणार नाहीत. ही हलकट कुत्री आहेत! ती उलटून चावाच घेणार!'' पण बुल्बाच्या या आरड्याओरड्याकडे कोणीच लक्ष दिले नाही.

तहनाम्यावर सह्या करण्याचा समारंभ साजरा झाला. बुल्बाने आपली तलवार उचलली, उसाचे कांडे मोडावे त्याप्रमाणे गुडघ्यावर ती ठेवून तिचे दोन तुकडे केले व ते दोन दिशांना फेकून देत तो म्हणाला, ''या तलवारीचे दोन तुकडे एकत्र येणे शक्य नाही,त्याप्रमाणे आम्हीही आमच्या शत्रूशी एकत्र येऊ शकत नाही! माझे अखेरचे शब्द तुमच्या लक्षात राहूद्यात.'' या ठिकाणी त्याचा आवाज उंच उंच चढला. धर्ममंदिरातील घंटानादाप्रमाणे खणाणू लागला, ''लक्षात ठेवा. माझे हे शब्द तुमच्या नाशाच्या वेळी तुम्हास नक्कीच आठवतील. तुम्हाला वाटत आहे, आपण शांतता आणली. पण तसं मुळीच नाही... अल्पावधीतच पोलिश लोक तुमची डोकी भादरतील, तुमच्या कवट्या गावोगाव प्रदर्शनार्थ नाचवतील! तुम्हाला तुमचे प्राण वाचवता येणार नाहीत! तुमच्यातील कित्येकजण त्यांच्या तुरुंगात खितपत पडतील आणि कदाचित वार्सा शहरात तुम्हाला तांब्याच्या हंड्यात बकऱ्याप्रमाणे शिजवलं जाईल!'' नंतर तो आपल्या सेनाविभागाकडे जाऊन म्हणाला, ''तुमच्यापैकी कुणाकुणाला रणांगणावरील मरण हवं आहे? घरी जाऊन बायकापोरांच्या रकट्यांत ज्यांना प्राण सोडायचे असतील त्यांनी मागे राहावं! नास्तिक पोलिश धर्मगुरूंना पाठंगुळीवर घेऊन हिंडण्याची तुमची तयारी आहे का?''

''नाही! नाही!!'' त्याच्या सेनाविभागातील लोक गरजले. ''ठीक आहे! चला तर!'' बुल्बा म्हणाला. त्याने आपली टोपी डोक्यावर गच्च दाबली. आग ओकणाऱ्या डोळ्यांनी तहनामा करणाऱ्या सेनाधिकाऱ्यांवर नजर फिरवली व घोड्यावर मांड टाकली. ''चला पोरांनो, धर्मलंड पोलिश कॅथॉलिकांना आपलं पाणी दाखवूया!'' त्याने कडाड् कडाड् करून आसूड उडविला व आपल्या घोड्याला इशारा दिला. तहनामा करून मागे राहिलेल्यांवर एक जळजळीत दृष्टिक्षेप टाकून तो आपल्या कडव्या सेनाविभागासह वावटळीप्रमाणे शत्रूमुलुखात घुसला.

कोसॅक सेनापती व इतर अधिकारी खाली माना घालून उभे होते. बराच वेळ विचार करीत होते. बुल्बाचे शब्द त्यांना डाचत होते, उदास करीत होते. आणि बुल्बाचेच शब्द खरे ठरले. नेव्ह येथे दगा करून पोलिश लोकांनी त्यांची डोकी मारली.

पण बुल्बा कोठे होता? काय करीत होता? तो पोलंडच्या मुलुखात खोल, खोल, आतवर शिरत होता. त्याने अठरा शहरे उध्वस्त केली. कित्येक कॅथॉलिक धर्ममंदिरे धुळीला मिळविली आणि तो कारकोव्ह शहराच्या वेशीवर येऊन धडकला. कित्येक पोलिश सरदार दरकदार लुटले गेले. त्यांच्या किल्ले-गढ्या जमीनदोस्त झाले. उंची उंची सामानाची नासधूस झाली. उंची कपड्यालत्त्याच्या वावड्या झाल्या. उंची मद्याची पिंपे उपडी झाली. ''ठेवू नका, काहीही शिल्लक ठेवू नका!'' तो आपल्या अनुयायांना हुकूम देत होता. तेथे दयामाया नव्हती. पोरांची डोकी भाल्यांवर नाचविली जात होती. पोलिश सुंदरींचीही कत्तल होत होती. त्यांच्या करुण किंकाळ्यांनी पोलिश भूमी थरथरत होती. गवताळ प्रदेशातील गवत कंप पावत होते, पण कोसॅक सैनिक द्रवत नव्हते. आगीचा डोंब उसळत होता. मानवी आहुत्या दिल्या जात होत्या.

''माझ्या ओस्टापचा हा बदला आहे! माझ्या लेकराचा छळवाद करणाऱ्यांना काडीमात्र दया दाखवायला मी तयार

नाही!'' बुल्बा म्हणत होता.

या धडाक्याने पोलिश सरकार हादरले. खडबडून जागे झाले. सेनापती पोटोकी याच्या नेतृत्वाखाली प्रचंड पोलिश सेना बुल्बाच्या पारिपत्यासाठी रवाना झाली.

सतत सहा दिवस बुल्बाचे कोसॅक या सेनेला हुलकावणी देत दौडत होते. आडमार्गाने त्यांची घोडदौड चालू होती. जनावरांवर इतका विलक्षण ताण पडत होता, की ती अगदी हैराण होऊन गेली होती. पोटोकीने प्रयत्नांची शिकस्त करून डॅनिस्टर नदीच्या काठी बुल्बाला गाठले. एका जुनाट पडक्या किल्ल्यामध्ये बुल्बा आपल्या सैनिकांसह विश्रांतीसाठी थांबला होता. पोलिश सैन्याने ही जागा अकस्मात घेरून टाकली.

डॅनिस्टर नदीच्या किनाऱ्यावरील एका उंच कड्यावर हा पडीक किल्ला होता. त्याची तटबंदी जागोजाग ढासळली होती. पडक्या तटबंदीच्या दगडामातीचे ढिगारे सर्वत्र पसरले होते. संरक्षण म्हणून या किल्ल्याचा काहीच उपयोग होण्याजोगा नव्हता. पण या पडक्या जागेच्या आश्रयानेच बुल्बा पोलिश सैनिकांना टक्कर देऊन होता. फार काळ टक्कर देणे शक्य होणार नाही, हेही तो जाणून होता आणि मग एके दिवशी फळी फोडून पार होण्याचा निर्णय त्याने केला. अचानक बुल्बाच्या सैनिकांनी वेढा घालणाऱ्या सैन्याला धडक दिली व सपाट्याने मार्ग काढला. धावाधाव चालू झाली. ''अरे देवा, घात झाला! माझी चिलीम पडली! कित्येक वर्षं ती माझी सहचरी आहे! ती तोंडात असल्याशिवाय माझी वीरश्री जागी होऊ शकत नाही!'' बुल्बा म्हणाला व पायउतार होऊन गवतात चिलीम हुडकू लागला. पण हा त्याचा वेडेपणा ठरला. पाठोपाठ आलेल्या पोलिश सैनिकांनी त्याच्यावर झडप घातली. त्याने आपल्या प्रचंड बाहुबलाने दहापाच सैनिकांना सहज झिडकारून फेकले, पण त्यांची संख्या एवढी होती, की हां हां म्हणता बुल्बाला त्यांनी गिरफ्तार केले, बांधून खचाटून टाकले.

''भाईनो, सुटा दौडा; माझी चिंता करू नका!'' तो आपल्या सैनिकांना उद्देशून ओरडला.

''आमची शिकार आमच्या हाती लागली!'' पोलिश सैनिक हर्षाने ओरडले, ''आता याचं पाहून घेऊ!'' ते म्हणाले. सेनापतीच्या परवानगीने त्यांनी बुल्बाला जिवंत जाळण्याचा निर्णय केला.

विद्युत आघाताने छिन्नछिन्न झालेल्या, वठून गेलेल्या एका प्रचंड वृक्षाच्या बुंध्यास बुल्बाला साखळदंडांनी बांधण्यात आले. त्याच्या हातापायात खिळे ठोकण्यात आले, पण बुल्बाचे तिकडे लक्षच नव्हते. ''दौडा बंधूंनो, त्या कड्याच्या बाजूने जा, एकदा नदीपार झालात, की तुम्ही सुटलात, फिरून तुम्हाला या मुलुखात यायचं आहे! या कुत्र्यांची कंबरडी मोडायची आहेत!'' तो ओरडत होता. आपल्या लोकांना तन्मयतेने इशारा देत होता. त्याचे हे शब्द वाऱ्यावर वाहात जात होते, पण त्यांच्या कानी पडत होते की नाही, कोण जाणे?

''नाश होणार, सर्वस्वाचा नाश होणार! अगदीच क्षुल्लक गोष्टीसाठी नाश ओढवणार!'' बुल्बा म्हणत होता. एवढ्यात त्याची नजर समोरच खालून वाहाणाऱ्या डॅनिस्टर नदीच्या चमकणाऱ्या पाण्याकडे गेली. एकाएकी त्याचे डोळे आनंदाने चमकू लागले. ''बांधव हो, डाव्या हाताने वळा, नदीपार व्हा!'' तो ओरडला. या खेपेस त्याचे शब्द बहुधा त्याच्या सहकाऱ्यांच्या कानावर गेले असावेत. कारण वारा त्याच दिशेने वाहात होता.

कोसॅक घोडेस्वार डाव्या बाजूला वळलेले दिसले. त्यांच्या घोड्यांची गती विलक्षण होती. बुल्बा ही घोडदौड पाहाण्यात रंगला होता. खुशीत होता. कोसॅक घोडेस्वार नदीच्या पात्राच्या कडेस असलेल्या कड्यावर आले. घोड्यांची शरीरे सर्पाप्रमाणे लांब झाली. त्यांनी कड्यावरून सफाईदारपणे झेप घेतली. हां हां म्हणता कोसॅक घोडेस्वार, डॅनिस्टर नदीच्या विशाल पात्रात धडाधड झेप घेऊ लागले व सफाईदारपणे पोहत पैलतीराला निघून गेले.

पाठोपाठ आलेल्या पोलिश सैनिकांनी हा विक्रम करण्याचा प्रयत्न केला. पण झेप पुरेशी लांब न गेल्याने, कडेलोट केल्याप्रमाणे ते कड्याखालील खडकावर आपटले व त्यांचा चेंदामेंदा होऊन गेला. ते दृश्य पाहून बुल्बाला मनापासून हसू आले. या सर्व देखाव्यात बुल्बा इतका रंगला होता, की आपल्या अंगावर फटके बसत आहेत, हातापायात मोळे घुसत आहेत, याचे त्यास मुळीच भान नव्हते.

''नमस्कार बंधूंनो! नमस्कार!'' तो त्याही स्थितीत

भानरहित होऊन ओरडत होता. ''माझी आठवण ठेवा आणि फिरून पुढील वसंत ऋतूत या प्रदेशात धाड घाला! ही पोलिश कुत्री आम्हा कोसॅकांना काय करणार? थांबा लेकाच्यांनो, आम्ही रशियन काय आहोत, हे लवकरच तुमच्या प्रत्ययाला येईल! आमचा असा एखादा नेता निर्माण होईल, की त्याच्या नेतृत्वाखाली तयार झालेल्या रशियन जनतेकडे वाकडा डोळा करून पाहाण्याची हिंमत साऱ्या जगात, कोणालाच होणार नाही!''

त्याच्या पायाखाली पेटविण्यात आलेल्या अग्नीच्या ज्वाला त्याचे पाय ग्रासीत वरवर येऊ लागल्या होत्या. त्यांनी बुल्बाचा सर्व देह ग्रासण्यात सुरुवात केली होती. तो वृक्षाचा प्रचंड बुंधाही बुल्बाच्या देहावर आग ओकू लागला, पण बुल्बाला त्याची क्षिती नव्हती. त्याची तंद्री लागली होती. तो स्वत:शीच पुन्हा पुन्हा म्हणत होता, ''जगातील कोणतीच शक्ती रशियाला नमवू शकणार नाही!''

खालून डॅनिस्टर नदीचा प्रवाह वाहात होता. तिचे अनेक लहान मोठे फाटे आजूबाजूला शिरले होते. त्यांच्या काठांवर घनदाट बोरूबने माजली होती. आरशाप्रमाणे चमकणाऱ्या तिच्या पाण्यात, वरून संथपणाने भरारी मारत जाणाऱ्या हंसपक्ष्यांची प्रतिबिंबे पडत होती. अनेक पक्ष्यांनी तिच्या किनाऱ्यावरील वृक्षांचा आश्रय घेतला होता. कोसॅक नौका संथपणाने तिच्या प्रवाहात संचार करत होत्या. बुल्बा पाहात होता. त्याचा देह जळत होता आणि मन शत्रूमुलुखात झडप घालीत होते. मनाचा व्यापार केव्हा थांबला हे त्याला समजलेच नाही.

●●●